

# पुणे जिल्हा

माधुरी नाईक

# पुणे जिल्हा

## भाग २

संकलन : माधुरी नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

# पुणे जिल्हा : भाग २

संकलन : माधुरी नाईक, मंचर

Madhuri. jadhav26@yahoo. co. in

9820234891

8369371412

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखक-लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखक वा लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १० एप्रिल २०१७

©esahity Pratishthan® 2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे पुस्तक महाराष्ट्रातील समस्त भटक्यांना समर्पित

माधुरी नाईक


Junnar
Ambegaon
Khed
Maval
Shirur
Pune
Mulshi
Haweli
Daund
Velhe
Purandar
Bhor
Baramati
Indapur

पुणे जिल्ह्याची सफर आज आपण करणार आहोत. पुणे तिथे काय उणे हे आपण नेहमी ऐकतो. खरंच! त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या फिरण्यासाठी पुण्यात स्थळे आहेत. आपल्या सोयीसाठी तालुक्याप्रमाणे त्याचे विभागीकरण केले आहे.मी मला जमेल तसे यात वर्णन केले आहे. काही नविन स्थळांची माहिती पुणेरी भटक्या मित्रांनी दिली आहे. काही इंटरनेट वरुन तसेच काही वर्तमानपत्रा मधे मिळालेली माहिती एकत्र केली आहे माझ्या पुढच्या भटकंतीसाठी. आणि हल्ली सर्व जण कुठे ना कुठे जात असतातच. गेले की तिथले फोटो काढुन ते आपल्या मोबाईलवर  डिसप्ले फोटो ठेवतच असतात. मग काय आपोआप डिसप्ले फोटो छान आहे. कुठे गेलेले असे विचारले की मिळाली थोडी नवी माहिती, नवे स्थळ. वाचक ही त्यांच्या जवळची अशी स्थळे नक्की कळवतील अशी आशा करते. प्रत्येक गावात एक मंदिर तर असतेच. असेल तर एखादी नदी काही ऐतिहासिक वारसा असेल तर तेवढेच कळवा.. काही स्थळे फार अगोदर बघितली असल्याने कसे गेलो होतो हे देखिल आठवत नाहिये. पण ते तुम्ही तर नक्किच शोधाल..त्यात पण एक मजा असते. रस्त्यांच्या बाबतीत माझा फार गोंधळ असतो. पण भटक्यांना काय ठिकाणाचे नाव कळाले तरी पुरे असते. पुढचे शोधण्याचे काम ते बरोबर करतात. तुम्हाला काही अजुन माहित असल्यास नक्की कळवा.

शिवरायांनी याच पुण्यात बालपणी संस्कारांचे व पराक्रमी धडे गिरविले. पेशवाईमध्ये याच पुण्याने राजधानीचे स्थान भूषविले. पेशव्यांचे कर्तृत्वही फुलविले याच पुण्याने. असे हे पुणे ! लोकमान्य टिळकांची ही कर्मभूमी. थोर समाजसुधारक जोतिबा फुल्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्यास सुरुवातही येथूनच झाली. या कार्याला प्रेरणाही या पुण्यातच मिळाली आणि.... विरोधही येथेच झाला.

समाजपरिवर्तन, सुधारणेच्या कार्यात सर्वस्व झोकून देणाऱ्या अनेक समाजसुधारकांचे कर्तृत्व याच पुण्याने फुलविले. गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), महात्मा जोतिबा फुले, यांसारखे समाजसुधारक ही

पुण्याच्या मातीने राष्ट्राला दिलेली देणगीच ठरली. रा. गो. भांडारकर, सुधाकर आगरकर,लोकमान्य टिळक, गोपाल कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या नररत्नांचे कार्यक्षेत्र ही हे पुणेच.

पुणे शहराच्या नावावरून जिल्ह्यासही पुणे जिल्हा असे नाव पडले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात होऊन गेलेल्या टॉलेमी याच्या लिखाणात पुण्याचा ‘पुन्नाटा’ असा उल्लेख आढळतो. राष्ट्रकूट राजवटीत या गावाचा ‘पुनवडी’ नावाने उल्लेख केला जाई. पुण्य या शब्दावरून पुणे हे नाव पडले असावे, अशीही एक उपपती मांडली जाते. मुळा व मुठा या नद्यांच्या संगमावर वसलेले पुण्यस्थळ म्हणून हे नाव पडले असावे. मोगल राजवटीत या गावाचा ‘कसबे पुणे’ असा उल्लेख आढळतो.

आंध्र, चालुक्य व राष्ट्रकुटांच्या प्राचीन राजवटी पुण्याने पाहिल्या. मध्य युगातील यादवांचा अमलही पुण्याने पाहिला. बहामनी, निजामशाही व आदिलशाही राजवटीही येथेच त्यांच्या मनात रुजले. मराठा राजवटीत पुणे हे एक महत्त्वाचे राजकीय केंद्र होते. पुढील काळात पेशव्यांनी आपली राजधानी येथे वसविली. १८१८ साली मराठेशाहीचा अस्त झाला व पुण्याच्या शनिवारवाड्यावरील भगव्या शेंड्याची जागा ‘युनियन जॅक’ने घेतली. स्वांतत्र्य आंदोलनातही पुणे अग्रभागी राहिले. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडक्यांची कर्मभूमीही पुणे हीच होती. पुण्याच्या गणेशखिंडीतच २२ जून १८९७ रोजी चापेकर बंधूनी रँड या जुलमी प्लेग कमिशनरचा वध केला. अनेक क्रांतिकारकांनी व स्वतंत्र्य सेनानींनी पुण्यास आपली कर्मभूमी मानले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि पुण्याच्या शनिवारवाड्यावरील ‘युनियन जॅक’ची जागा भारताच्या ‘तिरंगी झेंड्याने’ घेतली.

पुणे शहर भारताच्या इतर महत्त्वाच्या शहरांशी रस्ता, रेल्वे व हवाईमार्गाने चांगल्या प्रकारे जोडले गेले आहे. पुणे विमानतळावरुन पूर्वी फक्त देशांतर्गत वाहतूक चालत असे पण आता सिंगापूर व दुबईला जाणाऱ्या उड्डाणांमुळे, विमानतळ आंतरराष्ट्रीय झाला आहे.

नवा ग्रीनफिल्ड पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्र सरकार सुरू करणार असून तो चाकण व राजगुरुनगर या गावांमधील चांदूस व शिरोळी यांच्या जवळ (पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर) होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सोपवली गेली आहे.

पुणे जिल्ह्यातील तालुके : एकूण तालुके चौदा.

१. पुणे शहर

२. हवेली ६४

३. खेड ७५

४. आंबेगाव ८१

५. जुन्नर 74

६. शिरूर १०८

७. दौंड १२२

८. इंदापूर १२४

९. बारामती १२८

१०. पुरंदर १४१

११. भोर १५६

१२. वेल्हे १६०

१३. मुळशी १६२

१४. मावळ १५४

## हवेली तालुका :-




### चिंतामणि | थेऊर

### Chintamani | Theur

मोटार-थांब्यापासून अवघ्या एका फर्लांगावरच श्रीचिंतामणीचे देवालय आहे. देवालयाचे महाद्वार उत्तराभिमुख आहे. चिंचवडचे मोरया गोसावी यांचे वंशज श्री चिंतामणि देव यांनीच हे देवालय बांधले. त्यानंतर साधारण शंभर एक वर्षांनी, श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनी सभामंडप बांधला आणि ह्या देवालयाचा विस्तार केला. नंतर पेशव्यांचे सेनापती हरिपंत फडके आणखी इतर भक्तमंडळींनी मिळून ह्या देवालयात काही फेरफार करून त्याची भव्यता आणि शोभा अधिक वाढविली.

देवालयाच्या आवाराबाहेर जवळच पेशव्यांचा वाडा होता. परंतु तो वाडा आता तेथे उभा नाही. मुख्य दिंडीदरवाजाचे काही अवशेष मात्र अजूनही शिल्लक आहेत. वाड्याचे आवार बरेच भव्य दिसते. तेथील भव्य अवशेषांवरून त्या वाड्याच्या पूर्वीच्या भव्यतेची कल्पना येते. ह्या वाड्यापासून थेट नदीपर्यंतची फसरबंदी वाट पेशव्यांनी बांधून काढली होती. ही फरसबंदी वाट मात्र अजूनही सुस्थितीत राहिलेली आहे.

थेऊर गावाच्या तिन्ही बाजूला मुळमुठा नदीचा जणू काय वेडा पडलेला आहे. मुळामुठा नदीला अगदी बारमास, उदंड पाणी असते. त्यामुळे थेऊरला पाण्याची कधीच पंचाईत पडत नाही. नदीच्या डोहाला कदंबतीर्थ अथवा चिंतामणि तीर्थ असे नाव आहे.श्रीचिंतामणि हा डाव्या सोंडेचा गनपती आहे. मांडी घातलेले आसन आहे. मूर्ती अगदी रेखीव आहे. मूर्तीचे तोंड पूर्व दिशेला आहे. गौतम ऋषीच्या अहिल्येची देवांचा इंद्र यान फसवणूक केली व आपली कामेच्छा पुरी केली. गौतम ऋषींना हीगोष्ट कळताच त्यांनी अहिल्याआणि इंद्र अशा दोघांनाही शाप दिला. अहिल्या शिळा होऊन पडली आणि इंद्राच्या अंगाला क्षते पडली. सर्व देवांना फार दुःख झाले. त्यांनी त्या शापाबद्दल गौतमऋषीची विनवणी केली. गौतम ऋषींनी मग उःशाप दिला. श्रीगजाननाची आराधना केल्याने तुझ्या पापाचे क्षालन होईल असे त्याला सांगितले. बृहस्पतींनी इंद्राला गणेशमंत्र दिला. इंद्राच्या आराधनेमुळे श्रीगजानन प्रसन्न झाले. त्यांनी त्याला आशीर्वाद दिला. त्यामुळे इंद्राचे रूप पालटले आणि तो पुन्हा पूर्ववत दिसू लागला. हा गणपती, आपल्या मनात चितिलेले देतो म्हणून याचे नाव चिंतामणि असे पडले.

ह्या क्षेत्रासंबंधी दुसरी एक कथा सांगण्यात येते ती अशी -

ब्रह्मदेवाने आपल्या चित्ताला स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून चित्तवृत्तीचा प्रकाशक चिंतामणि याची आराधना केली. चिंतामणि प्रसन्न झाले आणि त्यांनी त्याला वर दिला. त्यामुळे ब्रह्मदेवाच्या चित्ताला स्थैर्य लाभले. ह्या प्रसंगाचे स्मारक म्हणून हे क्षेत्र प्रसिद्ध आहे. येथे साधकांच्या मोहजालाचे निराकरण होते. आणि त्यांना चित्तशांती लाभते.योगसिद्धीचा लाभ होतो. आणि आत्मसाक्षात्कारही होतो. याच क्षेत्रात कौडिण्य ऋषींचा आश्रम होता. मोरया गोसावी यांनी सुद्धा येथील अरण्यात उग्र तपश्चर्या केली. याच ठिकाणी त्यांनी त्यांना सिद्धि प्राप्त झाली होती. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांची पत्नई रमाबाई ह्यांच्या येथील वास्तव्यामुळे

ह्या क्षेत्राला विशेष महत्त्व आले. पेशव्यांचे दैवत गणपती. परंतु श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यंची ह्या श्री चिंतामणीवर विशेष भक्ति होती. राज्यकारभारातून थोडीशी जरी फुरसत मिळाली तरी विश्रांतीसाठी आणि मनःस्वास्थ्यासाठी, ते थेऊर येथील आपल्या वाड्यात येऊन रहात. ह्या चिंतामणीच्या सान्निध्यात राहूनच त्यांनी आपल्या अंगातील राजयक्ष्मा ह्या रोगाशी सामना दिला. आणि आपले प्राण त्यांनी शेवटी, श्रीचिंतामणीच्याच चरणावर अर्पण केले. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांच्या पत्नी रमाबाई ह्या त्यांच्याबरोबरच सति गेल्या. मुळामुठा नदीच्या काठावर सतीचे वृंदावन आहे. कार्तिक वद्य ८ला दरवर्षी तेथे रमामाधव पुण्यतिथीला उत्सव साजरा केला जातो.

देवालयाच्या एका ओवरीमध्ये श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे तैलचित्र लावलेले आढळते.

थेऊरला ह्या श्री चिंतामणीचा उत्सव दरवर्षी, भाद्रपदातल्या चतुर्थीला फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

थेऊर गावी चिंतामणि । देवेंद्रा जो वरदपाणी ।

गौतमाची शापवाणी । ज्याच्या कृपें आटली ॥





**खेड-शिवापूर :** हवेली तालुक्यात. येथील कमरअली दरवेशाचा दर्गा अनेक हिंदू-मुस्लिमांचे श्रद्धास्थान आहे.

**आळंदी ज्ञानेश्वरांचे समाधीस्थळ :-**

आळंदी महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत संत ज्ञानेश्वर यांचे आळंदी हे समाधिस्थान आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या जीवनातील काही काळ येथे व्यतीत केला. या आळंदी गावाला "देवाची आळंदी" असे म्हणतात, कारण चोराची आळंदी नावाचे आणखे एक गाव पुणे जिल्ह्यात आहे. ही देवाची पुण्यापासून अवघ्या पंचवीस किलोमीटरवर आहे. वारकरी लोकांसाठी तसेच समस्त मराठी जनांसाठी आळंदीला मोठे महत्त्व आहे. आळंदी हे शहर इंद्रायणी नदीच्या तीरावर वसलेले आहे. संत ज्ञानेश्वर समाधी मंदिराच्या मागच्या बाजूला नदीवर असलेला घाट अतिशय सुंदर आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी येथे १२१८ साली जिवंत समाधी घेतली. त्या जागी एक सुंदर समाधिमंदिर १५७० मध्ये बांधण्यात आले असे सांगितले जाते.आषाढ महिन्यातील एकादशीला आळंदीहून निघून पंढरपूरला ज्ञानेश्वरांची पालखी जाते. या पालखीसोबत लाखो वारकरी अंदाजे १५० किमी अंतर पायी चालत पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी जातात.वारकरी संप्रदायात पंढरपूर इतकेच आळंदी या तीर्थस्थानासही मोठे महत्त्व आहे. इंद्रायणी नदीच्या काठी वसलेल्या या गावी संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी संजीवन समाधी घेतली (इ.स. १२९६). त्यामुळेच आळंदीचं महत्व फार मोठं आहे. महाराष्ट्रात विठ्ठलभक्तीचा सुकाळ करून वारकरी संप्रदाय निर्माण करणारे लोकोत्तर संत म्हणून सातशे वर्षे अवघ्या महाराष्ट्राने ज्ञानेश्वरांना आपल्या हृदयात जपले आहे. `ज्ञानदेवे रचिला पाया । कळस तुकयाने चढविला' या ओळीनुसार भागवत धर्माची धुरा खांद्यावर वाहणारे हे दोन थोर संत महाराष्ट्राच्या लोकजीवनात अखंड विराजमान झाले आहेत. ज्ञानेश्वर महाराजांचे समाधीस्थान, विठ्ठल-रखुमाईचे मंदिर, सोन्याचा पिंपळ अशी अनेक स्थाने या तीर्थस्थानी भक्तिभावाने पाहण्यासारखी आहेत. याठिकाणी आषाढी-कार्तिकी एकादशीला यात्रा भरते तसेच ज्ञानेश्वर समाधी दिनी कार्तिक कृ. त्रयोदशीला येथे उत्सव असतो. श्री ज्ञानदेवांनी या ठिकाणी संजीवनी समाधी घेतल्याने, ह्या गावाचे महत्व अमर होऊन गेले आहे. गेल्या ७०० वर्षात अनेक संतांच्या आणि ऐतिहासिक

घटनांच्या पाऊल खुणा येथे उमटलेल्या आहेत. तसे पाहिले तर पौराणिक काळापासून हे गाव प्रसिध्द. इतिहासकार राजवाडे य़ांच्या मते आळंदी हे गाव मध्ययुगातले आहे. इ. स. ७६८ च्या कृष्णराज राष्ट्रकूटांच्या तळेगाव ताम्रपटात आळंदी गावाचा उल्लेख आढळतो. इंद्राने पृथ्वीवर येऊन महायाग केला तो इथेच. स्कंद पुराणातील सहयाद्रि खंडाच्या ६४ व्या अध्यायात या गावाची वारुणा, अलका, कर्णीका, आनंद व सिध्दक्षेत्र अशी नावे आली आहेत. मराठी संतांनी या गावाचे नाव लडीवाळपणे अलंकापुरी ठेवले आहे. हरिहरेंद्र स्वामींच्या समाधीवर यादव काळातील उल्लेख सापडतात. श्री शिवाजी महाराजांनी एका शेताचे उत्पन्न श्री ज्ञानदेवांच्या समाधी स्थानास दिले होते. त्यानंतर राजाराम महाराज, बाळाजी बाजीराव पेशवे, पहिले बाजीराव वगैरेंनी आळंदी गावाकडे लक्ष पुरविले आणि आळंदीला गावपण दिले. क्षेत्राच्या सौदर्यांत भर पडली. त्यानंतर अनेक धनिकांनी या गावातील वास्तू बांधल्या. हैबतबाबा पायरी : – हैबतबाबा हे श्री ज्ञानेश्वर महाराजांचे फ़ार मोठे भक्त. पंढरपूर येथे जशी नामदेवांची पायरी तशी आळंदी येथे हैबतबाबांची पायरी. त्यांचे वंशज आजही पालखी सोहळा चालवतात. श्री सिद्धेश्वर : – हे शिवलिंग फ़ार प्राचीन आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पुर्वी आळंदी प्रसिध्द होती ती सिद्धेश्वरामुळे. श्री ज्ञानेश्वरांचे हे कुलदैवत आहे. अजानवृक्ष : – हा वृक्ष पवित्र समजला जातो.या वृक्षाची छाया देऊळवाड्यात शतकानुशतके पडली आहे. याची मुळी समाधीस्थानात श्री ज्ञानदेवांच्या कंठास लागली आणि श्री एकनाथ महाराजांना दृष्टांत होऊन त्यांनी ती दूर केली अशी आख्यायिका आहे. येथे भाविक श्री ज्ञानेश्वरीची अखंड पारायणे करतात. सुवर्ण पिंपळ : – सुवर्ण पिंपळ वृक्ष देऊळवाड्यात फ़ार पुरातनकालापासून उभा आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या आईचे भाग्य या वृक्षामुळे उदयाला आले आणि जगाला चार सोन्यासारखी मुले मिळाली. श्री एकनाथ पार : – श्री ज्ञानेश्वरांच्या मंदिरात असलेल्या श्री केसरीनाथ मंदिरासमोरचा हा एकनाथ पार फार जुना होता.१९७६ साली चिंचवडचे ज्ञानेश्वर भक्त श्री.जगन्नाथ गणपती गावडे यांनी स्वखर्चाने पुन्हा बांधून संस्थानला अर्पण केला.या पारावर नाथांच्या पादुका बसविण्यात आल्या आहेत. पुंडलिकांचे देऊळ : – पुंडलिकांचे देऊळ पुण्यातील एक सावकार चिंतामण विठ्ठल माळवतकर यांनी १८५७ साली बांधले.हे मंदिर इंद्रायणी नदीच्या पात्रात आहे. विश्रांतवड : – श्री ज्ञानेश्वर- चांगदेव भेटीची साक्ष. वडगांव-घेनंद रस्त्यावर या भेटीची साक्ष विश्रांतवड आजही देत आहे.चांगदेवांचे असंख्य शिष्य विंचवाचे

रुपाने, अश्विन महिन्यात नवरात्र उत्सवाचे वेळी श्री ज्ञानदेवांची पालखी तेथे जाते त्यावेळी प्रगट होतात. पण वैशिष्ट्य म्हणजे कोणासही दंश करत नाहीत अशी भाविकांची श्रदधा आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी चालविलेली भिंत: चांगदेव वाघावर बसून आले. हातात सर्पाचा चाबूक होता. त्यांचा गर्वपरिहार करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज व त्याची भावंडे या भिंतीवर बसून त्यांना सामोरे गेले व त्यांना उपदेश केला. इतिहास :- चांगदेव नावाचे एक ज्येष्ठ योगी ज्ञानेश्वर महाराजांना भेटायला वाघावर बसून आले होते. त्यावेळी ज्ञानेश्वर आपल्या भावंडांसमवेत एका भिंतीवर बसून ऊस खात होते. चांगदेवाची भेट घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी त्या भिंतीलाच चालवत नेले अशी आख्यायिका आहे. ती भिंत आळंदीला आहे. संत ज्ञानेश्वरानी भगवद्गीता हा ग्रंथ मराठीत आणला.



**मोशी** चाकणपासून नजीकच असलेल्या मोशी येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र सुरू झाले आहे. चाकणपासून पुणे जवळ. त्यामुळे कुशल तंत्रज्ञानही सहजपणे चाकणसाठी उपलब्ध होत आहे.इथे महाशिवरात्रीला मोठा भंडारा असतो.

## निळकंठेश्वर ( डोणजे ) :-

पुण्यापासुन फक्त ५० कि.मी. दुर निळकंठेश्वर नावाचे हे सुंदर भटकंतीसाठी ठिकाण आहे. सिंहगडापासुन फक्त २० कि.मी. वर अत्यंत कमी गर्दीचे आणि सिंहगडाच्या तुलनेचे, किंबहुना त्याहुनही सुंदर. निळकंठेश्वर हे खरं तर एका मोठ्या डोंगरावर बसलेल्या शिव-शंकराच्या देवळाचे नाव देऊळ बऱ्यापैकी जुनं आणि फारच मोठ्ठं आहे. देवळाच्या परीसरात बरेच पौराणीक देखावे उभे केले आहेत. सगळया मूर्त्या सिमेंटच्या असल्यामुळं पावसापाण्याचा काही त्रास नाही. निळकंठेश्वरला जाण्यासाठी सिंहगडापायथ्याशी वसलेल्या डोणजे गावापासुन फाटा फुटतो जो पानशेत/ वरसगावाकडे जातो. त्या रस्त्याने थोडे गेल्यावर दोन मार्ग आहेत.

१. खानापुरच्या थोडे पुढे गेल्यावर निळकंठेश्वराची पाटी दिसते. तेथे गाडी लावायची. तेथुनच एक छोटी मोटरबोट धरणाच्या पाण्यातुन निळकंठेश्वराच्या पायथ्याशी आणुन सोडते. तेथुन पर्वताच्या टोकावर जाण्यासाठी रस्ता आहे. साधारण २ तासाचे चढण आहे. अर्थात रस्ता बरा आहे त्यामुळे घसरण्याची भिती नाही. एक सोप्पा ट्रेक म्हणुन हा मार्ग पत्करायला काहीच हरकत नाही.

२. खानापुरच्याच रस्त्याने वरसगाव धरणापर्यंत सरळ जायचे. वरसगाव धरणाच्या भिंतीपासुन एक छोटा रस्ता निळकंठेश्वराकडे जातो. हा रस्ता अत्यंत खराब आहे. पावसाळयात ठिकठिकाणी ओढे, नाले, छोटे धबधबे लागतात जे पार करुन जावे लागतात. अर्थात गाडीनेही अगदी शेवटपर्यंत जाता येत नाही. गाडी साधारण पर्वताच्या मध्यापर्यंतच जाते तेथुन पुढे चालतच जावे लागते. हे अंतर साधारण-पणे ३०एक मिनिटांचे आहे.

पावसाळयात भेट देण्यास उत्तम असे हे ठिकाण आहे. वर खाण्यापिण्याची फारशी (चांगली) सोय नाही त्यामुळे बरोबर खाणे, पाण्याच्या बाटल्या घेउन जाणे हेच योग्य.






लोणी काळभोर येथील प्राचीन कालीन महादेव मंदिर......













भगवान विष्णूचे दशावतार सर्वांनाच परिचयाचे आहेत. त्यांपैकी श्रीराम व श्रीकृष्णाची मंदिरे भारतभर आहेत. वराहमूर्तीचे देवालय फारच क्वचित आढळते. चाकणच्या चक्रेश्वरापाशी एक भग्न वराहमूर्ती आहे. रामटेक (नागपूरजवळ) आणि खजुराहो (मध्य प्रदेश) येथेही वराह देवालये आहेत. श्री विष्णुमूर्तींमध्ये प्रभावळीत दशावतार कोरलेले असतील, तर त्यातही वराहशिल्प आढळते. मानवी शरीर आणि वराहमुख अशा नृवराहाच्या मूर्ती असतात किंवा वराह हा पशुरूपातही दाखविलेला आढळतो, त्याला ""यज्ञ वराह म्हणतात. ....... अष्टविनायकांमधील प्रसिद्ध अशा मोरगावच्या मयूरेश्वराचे दर्शन घेऊन, जवळच्या आठ-दहा किलोमीटर अंतरावरील लोणी भापकर या गावी जाता येते. गावातील लोकांना दत्तमंदिराची वाट विचारावयाची आणि या भागात यायचे. इथे एक विस्तीर्ण आणि सुबक बांधणीचे कुंड आहे. या कुंडाची उत्तर बाजू इतर बाजूंपेक्षा वेगळी आहे. तिथे वराहमंडप आहे. या आटोपशीर मंडपात पूर्वी वराहमूर्ती होती. केव्हा तरी ती स्थानभ्रष्ट झाली. सध्या ही भग्न मूर्ती याच देवळाच्या पाठीमागील शेतात पडलेली दिसते.











लोणी काळभोर येथील निसर्ग रम्य पर्यटन तीर्थ क्षेत्र रामदरा...







लोणी काळभोर येथील भव्य साई मंदिर...

.



## देहू


**देहू** हे पुणे जिल्ह्यातील गाव आहे. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचे हे जन्मस्थान इंद्रायणी नदीच्या काठी असून याच गावात श्री तुकाराम सदैव वैकुंठाला गेले अशी आख्यायिका आहे. ज्या डोंगरात एकांतात बसून तुकारामांनी अभंग रचना केली व अवघ्या महाराष्ट्रात भक्तीचे मळे पिकवले तो भंडाऱ्याचा डोंगर देहूपासून अवघ्या ६ कि. मी. अंतरावर आहे. हा डोंगर भाविकांचे श्रद्धास्थान बनून राहिला आहे. आज या डोंगरावर जाण्यासाठी थेट पक्का रस्ता आहे. ज्या इंद्रायणी डोहात तुकारामाचे अभंग त्यांच्या निंदकांनी बुडवले तो डोहही इंद्रायणीकाठीच नजिक आहे. तुकाराम महाराजांच्या आत्मिक सामर्थ्यामुळे हे अभंग पुन्हा वर येऊन तरले होते.

देहू गावात वृंदावन, विठ्ठल मंदिर, चोखामेळयाचे मंदिर आदि स्थाने दर्शनीय आहेत. तुकारामबीजेला म्हणजे फाल्गुन वद्य द्वितीयेला देहू येथे वार्षिक उत्सव असतो.
इंद्रायणी काठी नवीन गाथा मंदिर बांधण्यात आलं आहे, संत तुकारामांचे अभंग मार्बल दगडा वर कोरवून मंदिराला आतून सजवण्यात आलं आहे पुण्यापासून मुंबईकडे जाताना २५ कि. मी. वर देहू हे इंद्रायणी नदीच्या काठावर असलेले लहानसे गाव. वारकरी आणि भक्ती संप्रदायाचे एक मोठे संत – श्री तुकाराम देहू गावी राहत. गाथा आणि अनेक अभंगांच्या रूपात संत तुकाराम महाराज आजही आपल्याला भेटतात. श्री संत तुकाराम महाराज हे श्री विठोबाचे नि:स्सिम भक्त. त्यामुळे प्रत्येक आषाढी एकादशीला संत ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणेच तुकाराम महाराजांचीही पालखी पंढरपूरला जात असते.

संत तुकाराम महराजांचे जन्मस्थान म्हणून हे प्रसिद्ध आहे. फाल्गुन वद्य द्वितीयेला (तुकारामबीज) येथे मोठी यात्रा भरते. त्याच दिवशी तुकाराम महाराजांनी सदेह वैकुंठगमन केले असे मानतात. विठ्ठल मंदिर, जुने शिवमंदिर, इंद्रायणीचा डोह ही देहूतील बघण्यासारखी ठिकाणे आहेत. जवळच रामचंद्र डोंगर, भंडारा डोंगर येथे कोरीव लेणीही आहेत. संत तुकाराम महाराज चिंतनासाठी, साधनेसाठी भंडारा डोंगरावर जात असत. प्रत्येक गुरुवारी व एकादशीच्या दिवशी मंदिरात कीर्तन होते. सध्या दिसणारे मंदिर इ. स. १७२३ मध्ये संत तुकारामांचा सर्वात लहान मुलगा नारायणबाबा यांनी बांधून घेतले अशी नोंद आढळते.









**उरूळी-कांचन :** हवेली तालुक्यात. येथील निसर्गोपचार केंद्र प्रसिद्ध आहे. सर्वात जुणे आणि प्रसिद्ध असलेले हे निसर्गोपचार केंद्र स्वातंत्र्यपुर्व काळात महात्मा गांधीच्या पुढाकाराने स्थापन झाले आहे. येथील उपचार पद्धतीच 'लक्श्य' वेगळ आहे. येथील उपचारपद्धतीत नैसर्गिकरीत्या शरीरतील विषद्रव्य बाहेर फ़ेकण्यावर विषेस भर दिला जातो तर अशा या केंद्राला नक्की भेट दिली पाहिजे.

निसर्गोपचार आश्रम , उरळीकांचन-४१२२०२,जिल्हा- पुणे

१९८२ च्या रॅमन मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी व थोर गांधीवादी कार्यकर्ते मणिभाई देसाई यांनी स्थापन केलेली भारतीय अॅग्रो फाऊंडेशन ही संस्था येथे आहे.

**कावडीपाट**

कावडीपाट हे गाव लोणी काळभोरपासुन जवळ आहे साधारण पुणे २० किमी. आहे. हे गाव मुळा मुठा नदीच्या किनार्यावर वसले आहे. तिथे दिसणारा सुर्यास्त आणि पक्षीदर्शन विलक्षण आहे. पुणे सोलापुर रोडवर मंजिरी गावाच्या पुढे टोल प्लाझाच्या २ मिनिट पुढे मनाली रिसोर्ट हा फलक दिसतो. तिथुन डाव्या हाताल वळायचे. पुढे एक अरुंद रस्ता शेताकडे जातो. पुढेच एक बांध आहे हाच तो आपला पॉईंट. ह्या गावामध्ये ५० हुन अधिक पक्षी आहेत. अनेक पक्षी प्रेमी इथे भेट देत असतात.
















Sumit


Sumit

**गिरीजा कृषी पर्यटन-** केंद्रसंपर्क - श्री. सुरेश तुकाराम सणस

मु. पो. नांदोशी,सणसवाडी,(किरकटवाडी)

ता. हवेली,जि.पुणे.

**विमल सरोवर कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क-

साई खुर्द,शहा फार्म हाऊस,

विरबाजी पासलकर पुतळा,

वारसगाव धरणावर बोटिंगजवळ,पानशेतगाव

ता. हवेली,जि.पुणे.

**सह्याद्री कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क - श्री. बाळासाहेब बबनराव बराटे

मु. बहुली,पो. सांगरुण,

ता.-हवेली, जि. पुणे.

**अभिनव कृषि पर्यटन -** केंद्रसंपर्क-श्री. संजय मुकुंद लेले

मु. गट नं. 276, मांडरेवाडी डोणजे ,

ता. हवेली, जि. पुणे.

**गप्पांगण कृषि पर्यटन -** केंद्रसंपर्क-श्री. ओंकार अ. देशपांडे

मु. पो. होळकरवाडी. पो. डोणजे

ता. हवेली, जि. पुणे .

**नेचर नेस्ट कृषि पर्यटन -** केंद्रसंपर्क-श्री. चंद्रशेखर विनायक शितोळे

मु. पो. कोरेगाव मूळ ,

ता.हवेली, जि. पुणे.

## खेड तालुका

राजगुरुनगर : खेड तालुक्याचे मुख्य ठिकाण. हुतात्मा राजगुरुंचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध. शिवराम हरी राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य पत्करलेले क्रांतिकारक होते. ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. राजगुरूंचा जन्म पुण्याजवळ खेड येथे ऑगस्ट २४, इ.स. १९०८ रोजी एका मराठीभाषक, देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना ‘रघुनाथ’ या नावानेही ओळखले जात असे.

लहानपणी १४ व्या वर्षी इंग्रजी विषयातील अपयशामुळे वडील भावाने आपल्या नवविवाहित वधूसमोर त्यांना इंग्रजी धडा वाचायची शिक्षा केली. हा अपमान राजगुरूंना सहन झाला नाही. अंगावरच्या कपड्यांनिशी, आईने तेल आणण्यासाठी दिलेले ९ पैसे व बहिणीने अंजिरासाठी दिलेल्या २ पैशांसह त्यांनी आपले घर सोडले. आधी नाशिक आणि त्यानंतर थेट काशीलाच (शिक्षणासाठी) ते पोहचले. काशीतील त्यांचा बराचसा वेळ हा लोकमान्य टिळक ग्रंथालयात, महाराष्ट्र विद्या मंडळातील व्याख्याने - वादविवाद ऐकण्यात आणि भारतसेवा मंडळाच्या व्यायामशाळेत लाठी-काठी, दांडपट्टा यांच्या शिक्षणात जात होता. त्या काळी कलकत्ता, पाटणा, कानपूर, लखनौ, झाशी, मीरत, दिल्ली, लाहोर ही गावे क्रांतिकारकांची माहेरघरे होती, आणि काशी येथील पं. मदनमोहन मालवीयांचे हिंदू विद्यापीठ हेच साऱ्यांचे आश्रयस्थान व गुप्त केंद्र होते.





मध्यंतरीच्या काळात राजगुरूंनी अमरावतीच्या श्री हनुमान आखाड्यात व्यायामविशारदाची पदवी मिळवली व हुबळीला डॉ. हर्डीकरांकडे सेवादलाचे शिक्षणही घेतले. त्यानंतर ते पुन्हा काशीत परतले. दरम्यान चंद्रशेखर आझाद यांचा राजगुरूंशी परिचय झाला आणि आझादांनी राजगुरूंना क्रांतिकारकांच्या गटात घेतले. ‘आपणासारिखे करिती तात्काळ असे आझाद, अन् दुजांसारखे होती तात्काळ असे राजगुरू, एकत्र आले आणि त्यांचे ३६ गुण जुळाले. इंग्रज सरकारशी ३६ चा आकडा हेच या गुणांचे फलित होते आणि या ध्येयासाठी व हौतात्म्यासाठी राजगुरू कायमच उतावळे असायचे. या संदर्भातील त्यांच्या भावना, त्यांचे वागणेच विलक्षण होते, त्यागासाठी ते कायम तयार; आसुसलेले होते. ही भावना इतकी पराकोटीची होती की, आपल्या आधी भगतसिंह किंवा इतर कोणीही फासावर चढू नये ही त्यांची इच्छा होती....... २३ मार्च रोजी जो हुतात्मा दिवस पाळला जातो तो राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव थापर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ.

## हुतात्मा राजगुरूवाडा




सुमारे १२ वर्षांच्या खटपटीनंतर राज्य सरकारने राजगुरू यांचा जुना वाडा संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला. या वाड्याच्या दुरुस्ती आणि नवीनीकरणासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्याअंतर्गत शिवराम हरी यांची जन्मखोली, देवघर आणि नदीकाठची भिंत यांचे बांधकाम करण्याची मूळ योजना होती. हे काम २४ ऑगस्ट २००८ (शिवराम हरींच्या जन्मशताब्दी समापनापर्यंत) पूर्ण व्हायचे होते. प्रत्यक्षात पुरातत्व खाते आणि त्यांच्या ठेकेदारांनी धडाधड जुन्या इमारती पाडून टाकल्या. त्याजागी नव्या इमारती मनमानी पद्धतीने उभारण्यास सुरवात झाली. स्थानिक कार्यकर्त्यांनी विरोध केल्यानंतर ते निकृष्ट बांधकाम पाडण्यात आले. नंतर जन्मशताब्दीच्या निमित्ताने घाईघाईने जन्मखोली बांधण्यात आली. त्यांच्या जन्मखोलीतुन एका छोट्याशा खिडकीतून भीमा नदीचे पाणी -चमचम करताना दिसत असे पण आता पुर्ण नदी जलपर्णीने हिरवी झाली आहे. पाणी कुठे दिसत पण नाही.

**कोयाळी** कोयाळी या गावात भानोबाच्या यात्रेतील देव-दानव युद्धाची परंपरा गेली कित्येक दशके अखंडपणे सुरू आहे. या देवाविरुद्धच्या युद्धात सहभागी होणारे तरुण देवाची वक्रदृष्टी पडल्यानंतर चक्क बेशुद्ध पडतात. त्यानंतर देवाला शरण देऊन त्याची कृपा प्राप्त करून घेतात. यावर्षी या देव-दानव युद्धात थोडे-थोडके नाही तर तब्बल ४१४ तरुण बेशुद्ध पडण्याचा प्रकार घडला.

## चासकमान

पुणे-नाशिक रस्त्यावरील राजगुरुनगर मार्गे चास या गावी जाता येतं. राजगुरुनगर ते चास सहा आसनी रिक्षा किंवा जीप उपलब्ध असतात. या गावात तटबुरुजांसह एक ऐतिहासिक वाडा आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची सासुरवाडी असणाऱ्या जोशी यांची ही गढी. जोशी यांच्या घरातील लाडूबाई ऊर्फ ताईसाहेब यांचा विवाह बाजीराव यांच्याशी झाला. सकलसौभाग्यसंपन्न काशीबाईसाहेब बनून त्या पेशवे कुटुंबात सामील झाल्या. त्याच जोशींचे विद्यमान वंशज या वाड्यात राहतात. अनेक ऐतिहासिक वस्तू त्यांच्याकडे आहेत. ...... चास गावात उजव्या सोंडेच्या गणपतीचे पाठक यांचे मंदिर, पाटणकरांचे लक्ष्मी-विष्णू मंदिर, लघाटे यांचे गणेश मंदिर आणि डौलदार दीपमाळ असलेलं श्री सोमेश्वर महादेवाचे मंदिर आहे. महाराष्ट्रातील अनेक मंदिरांमध्ये दगडी दीपमाळा आहेत. पण या सोमेश्वर महादेवाच्या देवळातील डौलदार दीपमाळ केवळ त्या सम तीच. त्रिपुरी पौर्णिमेला इथे दीपोत्सव होतो. तेव्हा तर दीपवैभव पाहण्यासारखेच असते.

भगिरथी तलाव.



## कुडेश्वर मंदिर, कोहिंडे बुद्रुक, पेठ :

इथे महादेवाचे मंदिर आहे. जवळच गोशाळा आहे. पाठीमागे झाडी आहे. त्यामुळे इथले वातावरण छान वाटते.







## किल्ले वाफगाव (श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर(प्रथम) जन्मस्थान ) :-

होळकरांच्या वैभवशाली इतिहासाचे उदाहरण म्हणजे वाफगावचा भुईकोट किल्ला होय. हा भुईकोट किल्ला रयत शिक्षण संस्थेला बक्षीस रुपात दिला आहे .राजगुरुनगर पासून १२ कि.मी. अंतरावर वाफगाव आहे.तेथे जाण्यासाठी एस .टी बस ची सुविधा आहे.वाफगावच्या प्रमुख ठिकाणी उतरल्यावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैभव स्मृती असे लिहिलेली वेस नजरेस पडते .तेथून काहीच अंतरावर किल्ला आहे .किल्ल्याच्या प्रमुख प्रवेश द्वारावर शिक्षण संस्थेचे नाव लिहिलेले दिसते (महाराजा यशवंतराव होळकर विद्यालय वाफगाव ).दाराच्या भींतीबुरुज या मजबुत दगडात असून दारांवर लोखंडी सुळे आहेत. किल्ल्याच्या आत राजदरबार ,राजमहाल ,अंधारी विहीर ,होळकर कालीन तोफा ,काही मंदिरे (विष्णू - लक्ष्मि ,विष्णू पंच्याती ,मांगीर बुवा),बावडी ,राजमहालाची तटबंदी,होळकर कालीन भव्य गुफा तसेच किल्ल्याच्या बाहेरील असलेले राजेश्वराचे मंदिर पाहण्यासारखे आहे.हा किल्ला शाळेला दिल्यामुळे या किल्ल्यावर रयत शिक्षण संस्था वाफगाव याचे नियंत्रण असून आतील असलेल्या गुफा बुजवण्यात आलेल्या असून बाजूचे दार व राजदरबाराचे आतील द्वार हे सिमेंटने कायमचे बंद केलेले आहे .हे पाहून इतिहास प्रेमीना जरूर दुख्ख होते .राजदरबाराचा आतून काही भाग पडला असून राजमहाल हा दुमजली असून मजबूत स्थित आहे.राजमहालाच्या आत होळकर कालीन सुबक लाकडी काम पाहवयास मिळते .या महालाला राणीचा महाल म्हणून ओळखला जातो . राजेश्वराचे मंदिर पाहिल्यावर आपणास होळकर कालीन रेखीव व सुरेख दगडी कामाचा बोध होतो .या मंदिरच्या नक्षीदार बांधकामात महेश्वर किल्ल्याची समरूपता पाहवयास मिळते .हा किल्ला महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचे जन्मस्थान आहे.या किल्ल्याचे बांधकाम हे सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या राज्यकाळामध्ये सुरु होऊन राणी अहिल्यादेवी यांच्या राज्यकाळात पूर्ण झाले असे म्हटले जाते (सदया पुरावा उपलब्ध नाही).होळकर प्रेमीनी हा किल्ला जरूर एकदा पहावा .







## कनेरसर

राज्यातील अनेकांचे कुलदैवत आणि श्रद्धास्थान असलेल्या कनेरसर ता. खेड येथील श्री यमाई देवीच्या दर्शनासाठी नवरात्र उत्सवाच्या काळात दरवर्षी मोठी गर्दी होते.. नवरात्र उत्सवाच्या काळात कनेरसर येथे देवीच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## कांदा व लसूण संशोधन केंद्र

बदलते हवामान, वाढती मागणी यामुळे राजगुरूनगर (जि. पुणे) येथील कांदा व लसूण संशोधन संचालनालय नियमित वेगवेगळया जाती विकसित करते. ह्याचा परिसर अतिशय मोठा आहे. पुणे नाशिक महामार्गाला लागुनच हे केंद्र आहे.एका रांगेत अशोकाची लावलेली झाडे आपले लक्ष वेधुन घेतात.

## जयहरी युवा फौंडेशन.




जेष्ट नागरिकांच्या समस्या, गरज त्यांची सुरक्षितता तसेच त्यांची मानसिकता यांसारख्या अनेक बाबींचा अभ्यास करून त्यांच्या सेवेसाठी जयहरी युवा फौंडेशन. मुंबई ( रजि. ) या सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने श्री यमाई मातेच्या वास्तव्याने पावन झालेल्या पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील श्रीक्षेत्र पूर-कनेरसर येथे ग्रामीण निसर्गरम्य परिसरात प्रशस्त हवेशीर सर्व सुखसोयीने सुसज्ज विनाअनुदनित द्वारका सेवा सदन, वृद्धाश्रम नव्हे - आपलं घर ! ची सुरुवात केली आहे.

द्वारका सेवासदन., मु. पो. मौजे पूर - कनेरसर,, तालुका - खेड, जिल्हा - पुणे., महाराष्ट्र - ४१०५०५.

जयहरी युवा फाउंडेशन : ९५० ३९ ४५८४०. द्वारका सेवा सदन : ७३८ ७७ १७१०१.

dwarkasewasadan@gmail.com

# आंबेगाव तालुका


AMBEGAON
Assembly Constituency Map
MURBAD
JUNNAR
PARNER
KARJAT
KHED ALANDI
MAVAL
SHIRUR
PIMPRI (SC)
BHOSARI
Ahupe
Tirpad
Malin
Vachape
Kondhaval
Ambegaon
Nigdale
Taleghar
Amondi
Shinoli
Chas
Kalamb
Ghodegaon
Ranjani
Valati
Manchar
Pimparkhed
Pargaon
Bhawadi
Lakhangaon
Peth
Dhamani
Takali Haji
Kawathe
Loni
Malthan
Pabal
Chincholi
Dhamari
Varude
Karegaon
Kendur
Ganegaon Khalsa
Karandi
LEGEND
Assembly Constituency Bdy.
Major Town / Village
Map not to Scale
Copyright © 2014 www.mapsofindia.com
(Map updated on 29th September 2014)




## पडकई - शाश्वत विकासासाठी...

कुसुम कर्णिक

‘शाश्वत’ ही संस्था पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातल्या जवळपास २५ गावांमधल्या आदिवासींसोबत काम करतेआहे. डिंभे धरणामुळे निर्माण झालेल्या विस्थापितांचा प्रश्न, भीमाशंकर अभयारण्यातल्या आदिवासींच्या जमीन-नोंदणीचा प्रश्न, मुलांसाठी बालवाडी, निवासी शाळा, रोजगार अशा अनेक प्रश्नांना घेऊन ‘शाश्वसत’चे काम चालू आहे. त्यांच्या या कामाची नोंद जागतिक स्तरावरही घेण्यात आलेली आहे. नुकतेच त्यांना युएनडीपीतर्फे दिल्या जाणार्‍ी मानाच्या ‘इक्वेटर’ पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

कुसुम कर्णिक यांनी प्रत्येक काम अनोख्या उत्साहाने, धडाडीने सुरू केले, पुढे नेले. त्यांच्या कामात आणि जीवनातही त्यांना साथ मिळाली आनंद कपूर यांची.

## अहुपे एक घाट वाट

अहुपेला जाण्यासाठी डिंभा या धरणावरुन एक कच्चा रस्ता थेट अहुप्यापर्यत केलेला आहे. या रस्त्यावरुन अहुपे घोडेगावपासुन ६२ कि.मी. वर आहे. शेवटचा ८ कि. मी. चा रस्ता दाट अरण्यातुन जातो. गावात शिरण्यापुर्वी एक छोटीशी पण दाट देवराई लागते. देवराई संपल्यावर उजवीकडे एक भैरोबाचे मंदिर लागते. मंदिराच्या पाठीमागे दहा मिनिंटावर पठारावर आपण कड्याच्या टोकाशी येतो. आहुपे घाट हा काही गड किंवा किल्ला नाहीय त्यामुळे वर असे कोणतेही अवशेष नाहीत. आहुपे गाव मात्र बघण्यासारखे आहे. डोंगराच्या कुशीत वसलेल्या या गावात पोहोचल्यावर थकवा क्षणात नाहीसा होतो. आहुपे घाटावरून आजूबाजूचे विहंगम दृश्य दिसते. जवळच असलेला गोरखगड आणि मछिंद्रगडाचा सुळका तर नजरच खिळवून ठेवतो. त्याच्या बाजूला सिद्धगड आहे तसेच कल्याण मुरबाड आणि माळशेज घाटाचा परिसरही न्याहाळता येतो. आहुपे गावामध्ये जेवण, नाश्ता आणि चहा याची सोय होऊ शकते. आहुपे घाट हा भीमाशंकरच्या जवळ असल्याने दाट जंगल आहे.

पुण्यावरून चाकण मंचर घोडेगाव डिंभे धरण या मार्गाने स्वत:च्या गाडीने अथवा एस.टी.ने आहुपे गावामध्ये जाता येते. खोपिवली गावामधून गिर्यारोहण करत आहुपे घाट बघणे अधिक चांगले. आडवाटेवरच्या या ठिकाणी जास्त गर्दी पण नसते त्यामुळे निसर्गरम्य वातावरण आणि शांतता अनुभवायला नक्कीच आहुपे घाट बघितला पाहिजे.

उंची-३८५५ फुट , राहण्याची सोय - खोपिवली गाव किंवा आहुपे गाव,

पिण्याचे पाणी - बरोबर न्यावे मध्ये मिळेलच असे नाही, जेवणाची सोय - खोपिवली आणि आहुपे गाव दोन्ही ठिकाणी उपलब्ध

## मंचर :

तपनेश्वर मंदिर मंचरच्या पश्चिमेला भीमाशंकरकडे जाणाऱ्या रस्त्यावर पांडवकालीन तपनेश्वर मंदिर आहे. मंचर या गावाचे प्राचीन नाव मणिपूर नगरी असे होते. पांडवाच्या इतिहासात तसा उल्लेख सापडतो. श्री तपनेश्वर मंदिराच्या बाजूला जी प्रचंड बारव होती , ती पांडवानी बांधलेली होती , तिचे तळे झाले होते. आज मंचरच्या ग्रामस्थांनी सिंमेट दगडाचे बांधकाम करून त्या तळयाचे पुन्हा बारवीत रूपांतर केले आहे. बब्रूवाहन हा अर्जुनाचा पुत्र. त्याने काही वषेर् या नगरीत राज्य केल्याचा इतिहास सापडतो. बब्रूवाहनाचा घोडा ज्या स्थळी घसरला त्या भागाला पूर्वी खाण असे म्हणत. आता ग्रामस्थांनी तिथे मंदिर बांधले आहे. आता त्या स्थानाला मणिपूर नगर असे म्हणतात. तेथे प्रत्येक वर्षी हरिनाम सप्ताह होत असतो. मंचरमध्ये दुंदभीतले कान्होबाचे मंदिर बुवासाहेब देवस्थान , पंचलिंगेश्वर मंदिर , अशी प्राचीन अवशेष असलेली स्थळे आहेत. मंचर हे जेष्ठ लेखिका , कवयित्री शांता शेळके यांचे गाव , महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध निसर्ग कवी ग. ह. पाटील हे ही या मंचरचेच होते. बाबासाहेब पाटलांच्या नंतर मंचरच्या अण्णासाहेब आवटे कॉलेजचे प्राचार्य म्हणून आलेल्या प्राचार्य पानवलांनी मंचर गावाला मोठे योगदान दिले आहे. मंचरमध्ये अण्णासाहेब आवटे कॉलेजची भव्य दिव्य इमारत तयार झाली. पानवलांनी जादूटोणा केल्यासारखे कॉलेजच्या परिसरातील चुनखडीचे माळरान मंतरून टाकले आहे. या खडकाळ माळरानावर नंदनवन फुलेल , असे काही वर्षापूर्वी कुणी भाकित केले असते , तर त्याला वेड्यात जमा केले असते. परंतु प्राचार्य पानवलांनी तेथे फुलविलेले नंदनवन आज प्रत्यक्षात उभे आहे.







## शमादाराचा डोंगर

मंचर गावापासून थोड्याशा अंतरावर एक छोटासा डोंगर आहे. त्याला श्यामाश्वराचा डोंगर म्हणतात. वर्षातून इथे एकदा जत्रा भरते. हा देव जसा मुसलमानांचा तसा हिंदूंचाही.लहानपणापासुन ह्या डोंगराबद्दल ऐकत आहे. बघुया कधी जाण्याचा योग येतो ते.

## वडगाव काशिंबे :

पुणे नासिक महामार्गावरील मंचर पासून अवघ्या २.५ कि.मी. अंतरावर असणारे आंबेगाव तालुक्यातील वडगाव काशिंबेग हे गाव निसर्गसंपन्न डोंगररांगांच्या कुशीत वसले आहे. लेण्याद्रि गिरिजात्मजाचे हे मुख असुन अर्धपीठ म्हणून हि याचा उल्लेख आहे , सदर देवस्थान करिता थोरले बाजीराव पेशवे यांनी दर साल एक रुपया ची सनद दिली होती ,तीच सनद इंग्रजांच्या काळात देखील चालू असल्याचे कागदोपत्री दिसून येते.सदर मंदिराच्या समोरच उत्तरेला लेण्याद्री च्या गिरीजात्मजाची पाठ असून दोन्ही मंदिरांची उंची सारखीच आहे.एका छोट्याशा बंधाऱ्या च्या काठावर हे गणेश मंदिर आहे. बंधाऱ्या तील हिरवेगार चकाकणारे पाणी, भव्य आकार, भोवतालचा रमणीय परिसर व सह्याद्री पर्वताची पार्श्वभूमी हे सारे पाहून मन प्रसन्न, आनंदी होते.या उत्सवाच्या काळात हजारो गणेशभक्त श्री मोरयाच्या दर्शनासाठी उपस्थिती लावतात.देवस्थानच्या वतीने प्रवचन, कीर्तनाचा प्रबोधनात्मक कार्यक्रम,भजनाच्या गजरात श्रींची सवाद्य मिरवणूक,महानैवेद्य व्यवस्था केलेली असते.

वर उल्लेखलेली सनद मोडी आणि इंग्लिश अशा दोन्ही भाषांमध्ये तेथे फलकावर लावली आहे. असे म्हणतात कि याच्या दर्शना शिवाय अष्टविनायक यात्रा अपूर्णच रहाते.

## थापलिंग

येथे खंडोबाचे मंदिर आहे. ही यात्रा मोठी असते. अनेक लहान मोठी दुकाने यात्रेत लागतात. लाखो रुपयांची उलाढाल होते. पण यात्रेत खरेदी करण्याची मजा काही वेगळीच  असते. ही यात्रा म्हणजे  पुर्वीचे मॉलच आहेत ते सर्व एका ठीकाणी मिळणार्या वस्तु.





## निरगुडसर

निरगुडसर हे गाव मंचर पासुन १५ कि.मी पुर्वेकडे वसलेले आहे. ग्रामदैवत मुक्तादेवी मंदीर, श्रीराम मंदीर, शधर्मराज मंदिर,महादेव मंदिर,विठ्ठल मंदिर,दत्त मंदिर,भैरवनाथ मंदिर,हनुमान मंदिर,ॐ भक्तीधाम (१८ देवतांचे मंदिर ),बेटवस्ती मधील मंदिर,मुक्तादेवी मंदिर (बेटवस्ती),काळमजाई मंदिर,शंकर मंदिर,गण्या डोंगर (गणपतीचे जुने ठाणे) अशी अनेक देव-देवतांची मंदीरे आहेत.






## दूधसागराचे पर्यटन मंचर

आवडो किंवा ना आवडो, पण बहुतेक मुलांना तो रोज प्यावाच लागणारा पदार्थ म्हणजे दूध. त्यामुळे दुधाचा परिचय लहानपणापासूनचाच. शिवाय बटर, चीज हे पदार्थही तुमच्या घरात अधूनमधून येत असतात, तेही दुधापासूनच बनतात, पण दूध तर रोजच तुमच्या घरी येतं.

आवडो किंवा ना आवडो, पण बहुतेक मुलांना तो रोज प्यावाच लागणारा पदार्थ म्हणजे दूध. त्यामुळे दुधाचा परिचय लहानपणापासूनचाच. शिवाय बटर, चीज हे पदार्थही तुमच्या घरात अधूनमधून येत असतात, तेही दुधापासूनच बनतात, पण दूध तर रोजच तुमच्या घरी येतं. ते तुमच्या घरापर्यंत पोहोचतं ते डेअरीमधून. तुमच्या शहरात अशा दुधाच्या खूप डेअरीही तुम्ही बघत असाल, परंतु डेअरीमध्ये हे दूध कुठून येतं? गाय किंवा म्हैस ते देते, हे तुम्हाला ठाऊक असणार, पण गायीचं दूध कसं काढलं जातं, तिचा गोठा कसा असतो, हे तुम्ही बघितलं नसणार? कारण पूर्वी घराच्या परसदारी गायी-म्हशींचा गोठा असायचा.

पण आता शहरात माणसांनाच राहायला जागा कमी तिथे गोठे कुठे असणार? गायीचा गोठा, दूध काढण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष बघायची संधी ‘गोवर्धन’ हे दूध बनवणाऱ्या कंपनीने उपलब्ध करून दिली आहे. या कंपनीने डेअरी पर्यटन हा नवाच प्रकार सुरू केला असून त्यात कंपनीच्या मंचर येथील फार्मची सहल करता येते. इथली केवळ डेअरी फार्मच नव्हे तर चीजसारखे इतर दुग्धजन्य पदार्थाचाही प्लांटही बघता येतो.

मंचर हे गाव पुण्यापासून ६० किलोमीटर अंतरावर आहे. देवेंद्र शहा आणि त्यांचे दोन भाऊ यांनी वडिलोपार्जित असलेल्या आपल्या इथल्या दूध व्यवसायाचं १९९३ मध्ये आधुनिकीकरण केलं आणि त्यातून गोवर्धन दुधाचा ब्रँड अस्तित्वात आला. ‘भाग्यलक्ष्मी’ असं नाव असलेला ‘गोवर्धन’चा फार्म हा भारतातला एक अत्याधुनिक डेअरी फार्म समजला जातो.

४० एकरवर पसरलेल्या या फार्ममध्ये हॉल्टसन जातीच्या ३५ गायी आहेत. या जातीची गाय प्रत्येक दिवशी वीस ते पंचवीस लिटर दूध देते. इथल्या दोन गायी तर दिवसाला पन्नास लिटर दूध देतात, हे वाचून

तर तुम्हाला आश्चर्यच वाटेल. या गायींना ‘ऐश्वर्या’ आणि ‘कॅटरिना’ अशी नावं देण्यात आली आहेत. या फार्ममध्ये गायींची खूप काळजी घेतली जाते. त्यांना दररोज आंघोळ घालण्यापासून नखांचीही साफसफाई केली जाते. त्यांना पोषणयुक्त आहार दिला जातो, तसंच बसण्यासाठी खास मॅटचा वापर केला जातो.

तसंच त्यांच्या करमणुकीसाठी त्यांना दिवसातून काही वेळ सिनेसंगीत, भजनं आणि अगदी एफएमवरील गाणीही ऐकवली जातात. प्रत्येक गायीला इथे एक खास नंबरही दिला जातो. तो कंप्युटरमध्ये टाकला की, तिचं वजन किती, ती किती दूध देते, तिला यापूर्वी कुठला आजार झाला होता, वगैरे सगळी माहिती मिळते. गायींचं दूध काढण्यासाठी इथे पूर्णपणे यांत्रिक पद्धत वापरली जाते. तिला ‘रोटरी पार्लर’ असं म्हणतात. विशेष म्हणजे, हा फार्म बघायला जाणा-यांचं र्निजतुकीकरण केलं जातं.

‘गोवर्धन’च्या या फार्ममध्ये दहा लाख लिटर दुधाचं उत्पादन होतं. इथलं ‘प्राइड ऑफ काऊज’ हे दूध तर थेट डेअरीतून घरोघरी पोहोचतं. जेणेकरून दुधात कुठलीही भेसळ होण्याची शक्यताच राहू नये. अर्थात, ते श्रीमंतानाच परवडणारं आहे. कारण त्या दुधाची किंमत आहे प्रति लिटर ८० रुपये.

मंचर इथे केवळ दुधाचं उत्पादन होतं असं नव्हे तर चीज, तूप, दही असे दुग्धजन्य पदार्थ तयार होतात. इथला चीजचा प्लांट तर आशिया खंडातला सगळयात मोठा प्लांट आहे. या प्लांटमध्ये दिवसाला ४० मेट्रिक टन चीज तयार केलं जातं, अशी माहिती कंपनीचे जनरल मॅनेजर संजय मिश्रा यांनी दिली. चीज बनवण्याची प्रक्रिया पाहण्यासारखी असते. इथं बनणारं चीज विदेशातील १५ देशांत निर्यातही होतं. आपल्याला ठाऊक नसतं, पण या चीजमध्येही अनेक प्रकार असतात. उदाहरणार्थ, पिझ्झावर वापरायचं मोझ्झारेला चीज, चीज सॉस, छेड्डार चीज. ही सगळी प्रॉडक्ट ‘गो’ या नावाने विकली जातात.

‘गोवर्धन’ने अलीकडेच ‘गो चीज’ हे नवं प्रॉडक्ट बाजारात आणलं आहे. त्याचं वैशिष्टय़ असं की, ते टय़ुबमध्ये मिळतं आणि सॉससारखं एखाद्या गोष्टीवर टाकता येतं. तीन वर्षापूर्वी कंपनीने आपला हा फार्म पर्यटकांसाठी खुला केला आहे. त्यासाठी ‘हिना ट्रॅव्हल्स’ या मुंबईतील कंपनीचं सहकार्य घेतलं आहे. ही

कंपनी मुंबईहून मंचरची एका दिवसाची सहल आयोजित करते. तेव्हा बच्चेकंपनी, गाय दूध कशी देते आणि त्याचा लोणी, चीज वगैरे पदार्थापर्यंत प्रवास कसा होतो, हे पाहायचं असेल तर मंचरला भेट द्या.

एडमंड पायपर यांना भेटण्यापूर्वी केवळ एक ब्रिटीश व्यक्ती मंचरला गाईंचा गोठा सांभाळण्या साठी आला आहे, हीच आमची कल्पना होती. पायपर यांच्याशी तासभर गप्पा मारून निघाल्यानंतर शेती, पशुपालन आणि व्यावसायिकता यांच्याबद्दलच्या अनेक नव्या कल्पनांनी आमची झोळी भरून गेली होती. अनेक प्रकारची नवी माहिती मिळाली होती. भारतीय शेतकऱ्यांचे दुखणे कुठे आहे, याची अंधुकशी कल्पना आली होती. तसेच भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे, मला काहीही माहित नसताना वाटायचे सगळे माहित आहे आणि जसजसे कळत गेले तसतसे जाणवत गेले, की मला काहीही माहित नाही.

दररोज चाळीस टन चीज बनण्यासाठी 'गोवर्धन'ला लागणारे दूध पुरविले जाते ते मंचरजवळच असलेल्या एका फार्मवर सांभाळलेल्या गाईंपासून. 'लोकमत'मध्ये पायपरबद्दल आलेली एक त्रोटक बातमीवाचून आम्ही तिथे गेलो होतो. आमच्यादृष्टीने ही एक रंजक घटना होती. त्यात रंजक काही नसून व्यावसायिकता आणि वैज्ञानिक माहितीचे ते एक उपयोजन होते, हे कळाले पायपर यांच्याचकडून.

शेतीविज्ञानात पदवी घेतल्यानंतर पायपरनी मायदेशी इंग्लंडमध्ये अनेक ठिकाणी कामे केली. लहानपणापासून शेतावर राबल्यामुळे शेतातच काम करण्याची आवड होती. इंग्लंडमधील यंत्रणेमुळे आणि लाल फितीच्या कारभारामुळे पायपरला कंटाळा आला आणि स्वारी निघाली पोलंडला. तिथून हंगेरी, सौदी अरेबिया बहारिन आणि जॉर्डन अशी यात्रा करून पायपरची  स्वारी भारतात आली. शहा यांनी 'गोवर्धन' च्या उत्पादनांसाठी ऑऱ्गॅनिक फार्मिंगचे प्रमाणपत्र मिळण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्यासाठी डेअरी व्यवसायातील आंतरराष्ट्रीय संकेतांचे पालन करण्यासाठी त्या प्रकारचे ज्ञान असणारी व्यक्ती हवी होती. त्यातून आधी मायकेल नावाच्या एकाची आणि दीड वर्षांपूर्वी पायपर यांची निवड करण्यात आली.

“मला केवळ काम म्हणून करायचे असते, प्राण्यांवर माझं प्रेम नसतं तर इथं एक क्षणभरही थांबलो नसतो,” पायपर म्हणाले. कारण सुमारे तासभर जनावरांच्या पालनाबाबत मांडलेली भूमिका आणि

त्यांच्याकडून मिळणाऱ्या उत्पन्नाचे असे काही गणित मांडले होते, की गाय म्हणजे त्यांना केवळ कच्चा माल वाटतो की काय अशी शंका मला आली होती. 2300 गाई आणि सुमारे शंभरेक कालवडी सांभाळणाऱ्या पायपरना विचारलं, की कालवडींना पिंजऱ्यात का ठेवलं आहे तर ते म्हणाले, कारण त्या उद्याच्या गाई आहेत. त्यांना काहीही इजा होऊ द्यायची नाही यावर त्यांचा कटाक्ष आहे. ते अशा थराला, की कालवडींना देण्यात येण्याऱ्या खाद्यावर माशा बसू नयेत, म्हणून ते झाकून ठेवण्यात येतं. त्यामुळे त्या प्राण्यांवर त्यांचे प्रेम आहे का नाही हा प्रश्न मला सतावत होता.

सुमारे तेवीसशे गाईंना तसेच कालवडींना स्वतंत्र क्रमांक देण्यात आला आहे. त्यांच्या अंगावर एक चिप बसविण्यात आली आहे त्यातून त्या गाईवर संगणकाद्वारे लक्ष ठेवण्यात येते. या गाईने किती खाद्य घेतले, तिच्य़ापासून किती दूध मिळाले, तिला कोणता आजार आहे का, तिच्यात आजाराचे काही लक्षणं आहेत का, हे सगळं त्या एका चिपच्या साहाय्याने पाहण्यात येतं. एवढंच नाही तर एखाद्या गायीने दिलेल्या दुधाचे तापमान जास्त असलं तर काहीतरी गडबड आहे, हेही त्या संगणकाच्या साहाय्याने कळतं. पन्नास गाईंचा एक गट अशा रितीने रोलर पार्लर नावाच्या यंत्रावर चढवून पाच मिनिटांत दूध काढण्यात येतं. या सगळयावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी पायपर साहेबांवर आहे.

ते हे काम काटेकोरपणे करत आहेत, याची चुणूक आमची गाडी भाग्यलक्ष्मी फार्ममध्ये प्रवेश करतानाच मिळाली. फाटकाजवळच जीपवर जंतुनाशकाचा फवारा करण्यात आला. त्यानंतर कालवडींच्या गोठ्यात जातानासुद्धा जंतुनाशक मिसळलेल्या पाण्यात पाय बुडवूनच आत प्रवेश करावा लागला. गायींचे दूध यंत्राद्वारे तीन वेळेस काढण्यात येते. ते पाहण्यासाठी खास प्रेक्षागृह केलेले आहे. तिथेच पायपर आणि आमचा संवाद झाला. आधी काहीसा आखडू वाटणारा हा माणूस नंतर एवढा खुलला, त्याला आवरताना आमच्या नाकी नऊ आले होते.

“भारतात सर्वाधिक गायी आहेत, पशुधन आहे. मात्र जगात प्रति गाय दुधाचे उत्पादन सर्वात कमी आहे. याचं कारण इथल्या लोकांना दिलेली चुकीची माहिती आणि काळानुसार न बदलणे,” हे त्यांचं निदान होतं. एकावेळी पाच पाच हजार गाईंचे गोठे सांभाळण्याऱ्या माणसानं ते सांगितलं म्हणजे खरंच असणार.




“ब्रिटनध्ये माणसांना पगार खूप द्यावा लागतो. त्यामुळे तिथे एवढा फार्म चालविण्यासाठी दोन किंवा तीन माणसे पुरतात. तुमच्या इथे माणसं मुबलक मिळतात. शिवाय त्यांना अनेक कामं करायला आवडत नाहीत. एक माणूस एकच काम करू पाहतो. गाई ढकलायला एक माणूस आणि मशीन चालू करायला दुसरा माणूस कशाला पाहिजेत? गाईंना एवढे आजार होतात त्यांच्यासाठी आम्हाला लसीसुद्धा मिळत नाहीत. फक्त तीन लसी घेण्यासाठी सरकारी परवानगी देत. इथं एवढ्या माशा आहेत, किडे आहेत त्यामुळे गाईंना खूप सांभाळावं लागतं. आता आम्ही इतक्या कडेकोट वातावरणात गाईंना ठेवलंय आणि त्यासाठी गुंतवणूक केलीय. पण सगळेच ते करू शकतील असं नाही,” त्यांचं सांगणं चालू होतं.




तिथे काम करणाऱ्या माणसांनी सांगितलं, की पायपर यांना जुजबी मराठी येतं. त्याच्या साहाय्याने त्यांनी हाताखालच्या माणसाला अगदी तयार केलंय. एका सहाय्यकाकडे बोट दाखवून ते विचारू लागले, “हाच माणूस जर जनावरांच्या खुराकाकडे लक्ष देऊ शकला, त्यांच्या बारीक सारीक बदलांकडे लक्ष ठेवू लागला, वेळेवर सगळी निरीक्षणे घेऊ शकला तर डॉक्टरची गरजच पडणार नाही. डॉक्टरचे काम फक्त आजारी प्राण्यावर उपचार करण्यापुरतेच राहतील. प्राण्यावर लक्ष ठेवण्याचं, रोगाचं निदान करण्याचं काम हाच माणूस करेल ना.” हे धोरण काहीसं सफल झालं असावंही कारण फार्मवर ठेवलेल्या कालवडींपैकी फक्त एक

टक्का कालवडींचा मृत्यू झाला. शिवाय भारतात कालवडींचा वाढीचे सरासरी प्रमाण दररोज तीनशे ग्राम असताना या कालवडींचा वाढीचे प्रमाण दररोज नऊशे ग्राम आहे.

हा माणूस इतक्या दूर का आला असवा? हाच प्रश्न विचारला असता पायपरचे उत्तर होते, "मला वेगवेगळया देशांमध्ये फिरायला आवडते. तिथली संस्कृती जाणून घ्यायला आवडते. दर दिवशी नवीन काहीतरी जाणून घ्यायला आवडते. शेवटी थेअरी सगळीकडे सारखीच असते. प्रात्यक्षक वेगवेगळे असतात. मी याच्यापेक्षाही उष्ण देशांमध्ये राहिलेलो आहे. त्यामुळे मला इथं फारसं वेगळेपण जाणवत नाही."

फार्मजवळच्याच एका बंगल्यात पायपर राहतात. त्यांना कोणीतरी विचारलं, "तुम्हाला इथं चर्च नाही मग कसं करता?" त्यावर त्यांचं उत्तर होतं, "माझा देव चार भिंतीच्या आत नाही. तो सगळीकडे आहे. त्यामुळे मला चर्चमध्ये जाण्याची गरज नाही. "

## हुतात्मा बाबू गेनू सैद



जन्म : १९०८(महाळुंगे पडवळ, तालुका आंबेगाव,पुणे) त्यांच्या या जन्मगावी त्यांचे घर जतन करुन ठेवले आहे. आणि गावात स्मारक आणि बगिचा बांधलेला आहे.पुस्तक वाचनालय देखिल चालु केले आहे.

मृत्यू : १२ डिसेंबर १९३०(मुंबई)

नोकरी निमित्त मुंबई येथे वास्तव्य. मुंबई येथे गिरणीत कामाला असून उदरनिर्वाह करीत असत. पण मनात स्वातंत्र्याचा ध्यास होता. १९३० साली वडाळा येथे झालेल्या सत्याग्रहात यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली. पुढे शिक्षा भोगून परतताच मुंबईत विदेशी कपड्याच्या बंदीची चळवळीत ते सक्रीय झाले.

१२ डिसेंबर १९३० रोजी विदेशी कपडे घेऊन एक ट्रक आला. दुकानाकडे जाणारा ट्रक बाबू गेनू यांनी अडवला. पोलिसांनी त्यांना बाजूला खेचण्याचा प्रयत्न केला पण बाबू गेनू रस्त्यावरच पडून आडवे झाले. ट्रक पुढे जाऊ देईनात. उद्दाम इंग्रजी ड्रायव्हरने तो ट्रक या २२ वर्षाच्या तरूणाच्या अंगावरून पुढे नेला. बाबुगेनूंना हौतात्म्य लाभले.

गावामध्ये दत्ताचे अतिशय जुणे मंदिर आहे.‘ तसेच भैरवनाथ, गणपती मंदिर देखिल आहेत.

**पुष्करणी** ची रचना अभ्यासताना त्यामध्ये बांधण्यात आलेले पायरी मार्ग आपणास थेट तळापर्यंत घेऊन जातो.

याचे जिवंत उदाहरण पहावयाचे झाले आंबेगाव तालुक्यातील मंचर ते रांजणी गाव रस्त्या मार्गावर चांडोली ते थोरांदळे यांच्या मधल्या भागात जंगल आहे. चांडोलीकडुन निघालात तर आपल्या उजव्या हाताला जंगलात रस्त्यालगत 25 मी.अंतरावर एक जोगा विहीर दिसते त्या भागातील प्रसिद्ध विहीर आहे. ती नक्कीच एकदा पहा. म्हणजे आपणास आपल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष निदर्शनातुनच मिळतील.

या पुष्करणी बांधण्याच्या पाठीमागील उद्देश अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारात आपणास ऐकावयास मिळतो. काही ठिकाणी बोलतात येथे अंतराळातून येणार्या लहरी मनुष्यांवर पॉजिटीव व शुद्ध विचार करण्यास प्रवृत्त करतात. आणि खरोखरच याची प्रचीती मला प्रत्यक्ष अनुभवयास मिळाली.

**खुर्द आणि बुद्रुक :-** महाराष्ट्रामध्ये खूप ठिकाणी खुर्द आणि बुद्रुक असे शब्द गावांच्या नावापुढे दिसतात. निवे खुर्द किंवा निवे बुद्रुक, तसेच आंबेगाव खुर्द आणि आंबेगाव बुद्रुक किंवा वडगाव खुर्द आणि वडगाव बुद्रुक अशी दोन दोन गावे शेजारीशेजारी वसलेली दिसतात. तर हा खुर्द आणि बुद्रुक काय प्रकार आहे ? मला पडलेला हा प्रश्न एकदा ऐतिहासिक लिखाण वाचताना सुटला. त्यात असे लिहिले होते – – – –

पूर्वी मुसलमानी अंमल होता तेव्हा उर्दूमिश्रित किंवा फारसी मिश्रित भाषा बोलली किंवा लिहिली जात असे. मोगल किंवा आदिलशाही कुतुबशाही, निजामशाही इत्यादी कालखंडामध्ये मुस्लीम अंमलात खुर्द आणि बुद्रुक हे शब्द वापरले जात. एखाद्या रस्त्यामुळे एका गावाचे दोन भाग पडत असले तर ते दोन भाग समसमान कधीच नसत. एक भाग छोटा तर दुसरा मोठा असे. त्यातील मोठा भाग असलेल्या गावाला बुजुर्ग आणि छोटा भाग असलेल्या गावाला खुर्द असे म्हणत. बुजुर्ग म्हणजे मोठा आणि खुर्द म्हणजे चिल्लर किंवा छोटा अशा अर्थाने त्या गावाच्या दोन्ही भागांना खुर्द किंवा बुद्रुक असे संबोधले जाई. या ‘बुजुर्ग’चा अपभ्रंश होऊन बुद्रुक हा शब्द तयार झाला आणि ‘खुर्द’चा अपभ्रंश न होता तो तसाच राहिला. आजही आपण खिशात मोठ्या किमतीच्या नोटा असल्या आणि छोट्या किंमतीची नाणी खिशात असली तर खिशात पैशांचा खुर्दा वाजतोय असे म्हणतोच.

**दुर्वांकूर फार्म कृषि पर्यटन –**

केंद्रसंपर्क-डॉ. लक्ष्मण विजय भवारी

मु. पो. तेरुंगण,

ता.आंबेगाव, जि. पुणे.

## जुन्नर तालुका

सकाळ साप्ताहिक

दंडकारण्य असलेला भूभाग जेव्हा नागरी वस्तीखाली येऊ लागला, तेव्हा महाराष्ट्र नावाचा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात आला. सातवाहन राजे हे महाराष्ट्राचे पहिले राजे. साधारण २५०० वर्षांपूर्वीचा कालखंड असेल तो. महाराष्ट्र तेव्हा समृद्धीच्या शिखरावर होता. प्रतिष्ठान आताचे पैठण ही सातवाहन राजांची राजधानी आणि जीर्णनगर आताचे जुन्नर ही उपराजधानी. त्या काळी जगभरातील व्यापारी कल्याण बंदरावर आपला माल घेऊन उतरत असत. मग नाणे घाट मार्ग ते घाटमाथ्यावर येऊन जुन्नरमार्गे पैठणला व्यापार करत करत जात असत. तेव्हाचे नाणे घाटातील कर आकारणीचे दगडी रांजण आजही इतिहास जिवंत करीत नाणे घाटात विराजमान आहेत. म्हणजे कल्याण-नाणे घाट, जुन्नर-नगर-पैठण हा महाराष्ट्रातील प्राचीन व्यापारी मार्ग होता. मग साहजिकच या मार्गावरील जुन्नर, बोरी, नगर, पैठणसारख्या बाजारपेठा तेव्हापासूनच प्रसिद्ध होत्या. हा व्यापारउदीम वाढत जावा, आपल्या प्रदेशाची अशीच भरभराट होत राहावी म्हणून या व्यापारी मार्गाच्या संरक्षणासाठी त्या त्या वेळच्या राजवटींनी ठिकठिकाणी किल्ल्यांची उभारणी केली. नाणे घाटमार्गे येत असताना जुन्नरचा डोंगराळ भागातून जाताना लुटमारीपासून बचाव करण्यासाठी भैरवगड. जीवधन, चावंड, हडसर, निमगिरी, शिवनेरी, नारायणगड, शिंदोला, रांजण, गड, कोंबड किल्ला यासारख्या किल्ल्यांची निर्मिती झाली आणि मोक्याच्या जागा हेरून, टिकाऊ खडकाचा प्रदेश म्हणून भारतातील सर्वांत जास्त गिरीदुर्ग जुन्नरमध्ये निर्माण झाले. देशविदेशातून येणारी व्यापारी त्यांची संस्कृतीही सोबत घेऊन यायचे म्हणूनच जुन्नरमध्ये डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी उत्खनन करीत असताना ग्रीक लोकांची देवता "युरोस'ची मूर्ती सापडते. चिनीमातीची भांडी, जुनी नाणी, सोन्याच्या मोहरा, शीलालेख असे खूप काही सापडते. येणारे व्यापारी मुक्त हस्ताने दान करीत असत. त्यामुळे प्रत्येक धर्माची, धर्मपिठाची भरभराट जुन्नर परिसरात झाली. भौगोलिक अनुकूलता आणि त्याला राजाश्रयासोबतच लोकाश्रयही जुन्नर परिसरात मिळत गेला आणि म्हणूनच लेण्याद्रीला बौद्ध लेणी समूहासारखा अमूल्य ठेवा निर्माण झाला. मानमोडी डोंगरात जैन देवीदेवता अंबा अंबिका यांच्या गुहा कोरल्या गेल्या, जुन्नर शहरात प्राचीन जैन मंदिर उभारले गेले, मध्ययुगीन काळात लेण्याद्रीच्या बैद्ध

लेण्यांमध्ये गिरिजात्मक गणपतीची स्थापना झाला, पेशवेकाळात ओझरच्या विघ्नहराचा जीर्णोद्धार झाला, ओतूरसारख्या ठिकाणी वैष्णव पंथाचा रामकृष्ण हरी हा मंत्र संत तुकारामांना त्यांचे गुरू चैतन्य महाराजांनी दिली, संत ज्ञानेश्वरांनी आपल्या रेड्याला आळे गावी समाधी दिली. पिंपळगाव धरणाजवळ खुबी गावात खिरेश्वर या पांडवकालीन मंदिराची निर्मिती झाली, खिरेश्वरच्या उत्तरेला हरिश्चंद्र गडाची अभेद्य वास्तू उभी राहिली. काळाच्या ओघात खूप काही बदलत गेले, अनेक राजवटी आल्या..गेल्या...वैभव ओसंडून वाहू लागले आणि त्याला आटही आली. शेकडो वर्षे वैभव अनुभवत असलेले लोक कधी गुलामगिरीत ढकलले गेले, तर कधी दुसऱ्याच्या दरबारात चाकरी करण्यात धन्यता मानू लागले. कुणबी, बलुतेदार नाडले जाऊ लागले आणि एका योग्य वेळी जन्माला आला एक सरदाराचा मुलगा, चारचौघांसारखा सामान्यच; पण असामान्य स्वप्न घेऊन! 1628 मध्ये शिवनेरी किल्ल्यावर शिवरायांचा जन्म झाला. सर रिचर्ड टॅपल यांनी एका ठिकाणी लिहिले आहे, की युगपुरुष जन्मायला अत्यंत आदर्श जागा म्हणजे शिवनेरी. गडावरील शिवाई देवीचे मंदिर आजही तसेच आहे.

### भौगोलिकदृष्ट्या संपन्न

जुन्नर आणि कलेचे, सुधारणांचे फार पूर्वीपासून नाते आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या "शेतकऱ्याचा आसूड'मध्ये जुन्नर कोर्टाच्या निकालाचा उल्लेख आहे. जुन्नरमध्ये माणिकडोह धरणाच्या पायथ्याला बिबट्या निवारा केंद्र उभारण्यात आले आहे. समुद्रसपाटीपासून २२६० फूट उंचीवर असणाऱ्या या जुन्नरच्या पठाराला भारताचे पहिले वनरक्षक डॉ. अलेक्झांडर गीबसन यांनी भारताचे आरोग्य केंद्र म्हटले आहे. इथल्या स्वच्छ आणि मोकळया हवेत श्वसनाचे आजार बरे होतात हे त्यांचे निरीक्षण होते. म्हणूनच ब्रिटिश काळात ते ब्रिटिशांना जुन्नरला जाऊन आराम करायचा सल्ला देत असत. त्यांनी जुन्नरमध्ये हिवरे बुद्रुक या ठिकणी १८३९मध्ये वनस्पती उद्यान उभारले होते. १९९५मध्ये जगातील सर्वांत मोठी रेडिओ दुर्बिण जुन्नरमधील खोडद या गावी उभारण्यात आली, यामुळे जुन्नरचे भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान म्हणून अधोरेखित झाले. सोबतीला अर्वीचे उपग्रह भूकेंद्र, आणे घाटातील नैसर्गिक पूल, बोरी गावात कुकडी नदीच्या पात्रात आढळणारी १४ लाख वर्षे जुनी त्रेफा हे सारे जुन्नरचे भौगोलिक महत्त्व अणखी वाढवित आहेत.

## कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण

शेतीच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणारा जुन्नर; भाजीपाला, फळफळावळ, दुधदुभते, अगदी भात ते ज्वारी, द्राक्ष ते डाळिंब, ऊस ते ग्रीन हाउसमधील भाजीपाला आणि फुले अशी विविध प्रकारची शेती जुन्नरमध्ये केली जाते. गंमत म्हणजे महाराष्ट्रातील सर्वांत जास्त धरणे असलेला तालुका म्हणुन जुन्नरचा नावलौकिक आहे. पिंपळगाव जोगा, माणिकडोह, यडगाव, चीलेवाडी पाच घर, आणि वडज ही धरणे जुन्नरमध्ये आहेत, संततधार पडणाऱ्या पावसापासून ते अवर्षणग्रस्त भागापर्यंतचा भूभाग जुन्नरमध्ये आहे. जुन्नरमध्ये असणारी खोडदची दुर्बिण आणि बिबट्याचे क्षेत्र, डोंगराळ भाग यामुळे जुन्नरला आरक्षित हरित पट्टा म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे जुन्नरमधील हवा मोकळी आणि शुद्ध राहिली आहे. राहण्यासाठी, आरामासाठी आणि पर्यटनासाठी जुन्नर हे अतिशय उपयुक्त ठिकाण बनले आहे; तसेच जुन्नरमध्ये मिळणारी मटण-भाकरी आणि मसाला वडी (मासवडी) हे प्रसिद्ध पदार्थ आहेत. जुन्नरचे हे सारे पर्यटन वैभव जतनाचे काम जुन्नर पर्यटन विकास संस्थेमार्फत सुरू आहे. जुन्नरमधील संस्कृती जतनाचे, किल्ले संवर्धनाचे अतुलनीय काम शिवाजी ट्रेलच्या माध्यमातून सुरू आहे.

**प्रस्तावना -** महाराष्ट्रामध्ये जुन्नर तालुक्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, भौगोलिक, सांप्रदायिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान आहे. तसेच वैविध्यपूर्ण शेतीसाठी ( ) जुन्नर तालुका संपूर्ण महाराष्ट्रात अग्रगण्य तालुका म्हणून ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरी, अष्टविनायकांपैकी श्री क्षेत्र ओझर व श्री क्षेत्र लेण्याद्री, हौशी पर्यटकांचे आकर्षण असलेला माळशेज घाट, तालुक्यात असलेले विविध किल्ले व गड तसेच वैविध्यपूर्ण शेती या व अशा वैशिष्टयांमुळे जुन्नर तालुका आता कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन, गिर्यारोहण व भाविकांसाठी पर्यटनाचा केंद्रबिंदू म्हणून वेगाने विकसित होत आहे. भविष्यामध्ये पर्यटन तालुका म्हणुन विकसित करणेसाठी जुन्नर तालुक्यातील खालील महत्त्वपूर्ण स्थळांचा विकास करणे आवश्यक आहे.

**गड व किल्ले :-**

**शिवनेरी किल्ला -** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान व पायथ्याशी ऐतिहासिक असे जुन्नर शहर. संपूर्ण देशातून असंख्य शिवप्रेमी व पर्यटक दर्शनासाठी वर्षभर या किल्याला भेट देतात. पायथ्याशी भक्तिधाम म्हणुन नविन छान असे मंदिर झाले आहे. मंदिरामध्ये सावतामाळी, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज, राम सिता, राधा कृष्णा यांच्या सुबक मुर्ती आहेत.

**जीवधन गड -**जुन्नर तालुक्याच्या पश्चिमेला सह्याद्री पर्वतरांगामध्ये वसलेला घाटघर ग्रामपंचायत हद्दीतील गड. हा गड महाराष्ट्रातील गिर्यारोहकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे . गडावर जाणारी वाट जुन्नर-घाटघर मार्गेराजदरवाज्याची आहे. ही वाट घाटघरहून सरळ गडावर जाते. वाट अत्यंत सोपी आहे.

**हडसर किल्ला व चावंडचा किल्ला -**मोठया संख्येने गिर्यारोहक या दोन्ही गडांवर गिर्यारोहणासाठी येत असतात. यांपैकी चावंड जुन्नर शहरापासून तासाभराच्या प्रवासावर असलेल्या आपटाळे गावानजीक आहे. गडाच्या पायथ्याशी चावंड गाव वसलेले आहे. नाणेघाटापासून जुन्नरच्या दिशेने १५कि.मी. च्या आसपास चावंड वसलेला आहे. हडसर किल्ल्याचे दुसरे नाव म्हणजे पर्वतगड.

**हरिश्चंद्रगड -**पुणे व अहमदनगर जिल्ह्यांच्या सीमेवर असलेला अत्यंत महत्त्वपूर्ण गड. जुन्नर तालुक्यातील खिरेश्वर गावातुन जाणार्या रस्त्याने गिर्यारोहक व भाविक या गडावर वर्षभर जात असतात .

**नारायणगड** -जुन्नर तालुक्यातील पूर्वेकडील खोडद ग्रामपंचायत हद्दीतील या गडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे काही काळ वास्तव्य होते असे सांगितले जाते.

**सिंदोळा किल्ला** जुन्नरच्या वायव्येला आहे. मढनेर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खोप्यात असलेला सिंदोळा किल्ला माळशेज घाटाच्या माथ्यावर आहे. अहमदनगर-कल्याण हा गाडीमार्ग माळशेज घाटामधून जातो. या गाडीमार्गावर मढ गावाच्या पश्चिमेला ४ कि.मी. अंतरावर खुबी फाटा आहे. या खुबी फाट्यावर जुन्नर कडूनही येता येते. खुबी फाट्यावर उतरुन येथून उत्तरेकडील हरिश्चंद्रगडाकडे जाणारी वाट आहे.

**नाणेघाट** हा घाट फारच पुरातन आहे. नाणेघाट सुमारे सव्वादोन हजार वर्षापूर्वी खोदला गेला. प्रतिष्ठान ही सातवाहनांची राजधानी. सातवाहन काळात कल्याण ते प्रतिष्ठान (जुन्नर) या राजमार्गावर नाणेघाटात डोंगर फोडून ह्या मार्गाची निर्मिती केली गेली. मुंबईकरांना नाणेघाटाला यायचे असल्यास कल्याण मुरबाड मार्गेवैशाखरे गावी यावे. वैशाखरे हे जरी पायथ्याचे गाव असले तरी तेथे न उतरता वैशाखरे पासून पुढे दोन कि.मी अंतरावर असलेल्या नाणेघाट या नामनिर्देशित फलकाच्या मार्गाने थेट दोन तासात आपल्याला नाणेघाटावर पोहचता येते.

**तीर्थक्षेत्रे व देवस्थाने :-**

**श्री क्षेत्र लेण्याद्री -**अष्टविनायकांपैकी एक असलेले श्री गिरिजात्मकाचे पांडव कालीन लेण्यामंध्ये वसलेले गणपती मंदीर.

**श्री क्षेत्र ओझर -**अष्टविनायकांपैकी एक असलेले श्री विघ्नेश्वराचे हेमाडपंथी गणपती मंदीर.

**श्री क्षेत्र ब्रम्हनाथ पारुंडे –**



संपूर्ण देशामधील कुंभमेळा भरणार्या चार तीर्थक्षेत्रांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. या ठिकाणी दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो व खुप मोठया संख्येंने साधुगण व भाविक या ठिकाणी येत असतात. नाशिकचा कुंभमेळा झाला की मग सर्व साधु लोक ईकडे येतात. इथे नाथपंथातील दोन पंथाचे मंदिर आहे. मागे स्वयंभु शंकर महादेवाची पिंड आहे. मंदिर ५००० वर्षापुर्वीचे आहे. इथुन जवळच ३ कि.मी.वर वैष्णवधाम आहे. तिथे जुणे किर्तनकार महाराज यांचे मंदिर आहे. आणि आश्रम मधे मुलांना निवाशी किर्तन वारकरी प्रशिक्षण देतात.

**वारकरी सांप्रदाय**

ब्रम्हनाथ पारुंडे इथुन जवळच ३ कि.मी.वर वैष्णवधाम आहे. तिथे जुणे किर्तनकार महाराज यांचे मंदिर आहे. आणि आश्रम मधे मुलांना निवाशी किर्तन वारकरी प्रशिक्षण देतात. जुन्नर तालुक्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये किर्तनकार असून त्यांचे मार्फत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातुन प्रबोधनाचे काम केले जाते. तसेच तालुक्याला फार मोठी वारकरी सांप्रदायाची पार्श्वभूमी आहे.

**श्री क्षेत्र रेडा समाधी, आळे -** संपूर्ण विश्वाची माऊली संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या रेडयाच्या मुखातून वेद वदविले, त्या रेडयाची समाधी या ठिकाणी आहे.

**चैत्यन्य महाराज समाधी, ओतुर-** जद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचे गुरु श्री चैत्यन्य महाराजांची समाधी या ठिकाणी आहे.

**श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान वडज व धामणखेल -**महाराष्ट्राचे कुलदैवत श्री कुलस्वामी खंडोबाची प्रसिध्द मंदिरे. मंदिरे अतिशय सुंदर आहेत. वडजला जुने खंडोबा देवस्थान व नविन खंडोबा देवस्थान अशी दोन स्थाने आहेत.वडजला मंदिराच्या बाजुलाच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आहे.बाजुलाच मोठा लग्नमंडप आहे इथे मोठ्या प्रमाणावर सामाजिक लग्न सोहळे होतात.भक्तांसाठी भक्तनिवास बांधलेले आहे.

**श्री कपर्दिकेश्वर देवस्थान –** मुंबईहुन कल्याण-मुरबाड –माळशेज घाटमार्गे ओतुर अंदाजे २०० कि, मी. आहे. आळेफाट्याकडे जाताना वाटेत ओतुर गाव लागते. ओतुर गावात प्रवेश केला म्हणजे पुरातन तटबंदी, दरवाजे यांची रचना पाहुन मनाला ऐतिहासिक नगरीत प्रवेश केल्याची जाणीव होते. गावाच्या उत्तर दरवाजातुन बाहेर पडले, की अनेक मंदिर दिसतात. त्यातील एक शिवस्थान म्हणजे कपर्दिकेश्वर मंदिर. दगडी बांधणीच हे मंदिर प्राचीन आहे. या पवित्र ठिकाणी दरवर्षी श्रावणी सोमवारी मोठी यात्रा भरते. त्यावेळी अतिशय सुंदर अशी तांदळाच्या पिंडी तयार करण्याची प्रथा येथे आहे. पुत्रप्राप्तीसाठी सव्वामण तांदळाचा येथे नवस केला जातो. भाविक आदल्या रात्री मोठ्या भक्तीभावाने येथील गुरवाच्या हाती तांदुळ देतात. पुजा करणारा गुरव श्रावणातील रविवारी रात्री शुचिर्भुत होऊन गाभार्यात प्रवेश करतो. लिंबावर कोरड्या तांदळाच्या पाच ते सात फुट उंचीच्या शिवपिंडीची आकर्षक उभारणी करतो. त्यावेळी गुरवाच्या डोंळयावर पट्टी बांधली जाते असे बोलतात. तरी पण सर्व तांदुळाचे वजन सव्वा मण भरले जाते. हे तांदुळ भाविक लोक प्रसाद म्हणुन घरी नेतात.  श्री कपर्दिकेश्वर मंदिराच्या आवारात चैतन्यस्वामींची संजीवन समाधी आहे.बाबाजी  चैतन्यस्वामी हे संत तुकाराम महाराजांचे आध्यात्मिक गुरु होते. महाराष्ट्रात जिंवत समाधी घेतलेले म्हणजे संत द्न्यानेश्वर, मोरया गोसावी व तिसरे बाबाजी उर्फ केशव चैतन्य महाराज. चैतन्यस्वामींच्या वंशातील एका सत्पुरुषास दृष्टांत झाला. आणि त्यांनी कपर्दिकेश्वर मंदिराच बांधकाम करण्यास सुरवात झाली. श्रावण महिन्यात येथे कुस्त्यांचे सामनेही असतात.

याच परिसरात उत्तरेश्वर मंदिर देखिल आहे. प्रशस्त मोकळी जागा, पाण्याचे उत्तम सोय आणि बहरलेला निसर्ग, असा हा सारा परिसर एक दिवसाच्या भटकंतीसाठी मस्त आहे.

**ओतुर व श्री कुकडेश्वर देवस्थान पुर -**सर्व भाविकांचे श्रध्दास्थान असलेली श्री शंकराची प्रसिध्द मंदिरे.

**वरसुबाई देवस्थान, हिवरे पठार -**सर्व भाविकांचे व विशेष करुन महाराष्ट्रातील आदिवासी बांधवांचे श्रध्दास्थान असलेले व अत्यंत उंचावर वसलेले देवीचे मंदिर.

**श्री रंगनाथ स्वामी महाराज मंदिर आणे -**आणे या ठिकाणी श्री रंगनाथ स्वामी यांचे मंदिर असुन याठिकाणी मोठी यात्रा भरत असुन मोठया प्रमाणात भाविक वर्षभर दर्शनाला येत असतात.

**कै. यशवंतराव चव्हाण यांचे नियोजित स्मारक, येडगाव :-**तालुक्यातील येडगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येडगाव धरणालगत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांचे स्मारक उभारण्यात येणार असुन सदर स्मारकाचा आराखडा मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे.

**G.M.R.T. (Giant Meterwave Radio Telescope),खोडद :-**



जुन्नर तालुक्यातील खोडद ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये असलेली जगातील सर्वात मोठी दुर्बीण. भारत सरकारचा अणुउर्जा विभाग व टाटा मुलभूत संशोधन संस्था (T.I.F.R.) यांच्या मार्फत खगोल भौतिकीशास्त्राच्या अभ्यासासाठी ही दुर्बीण उभारण्यात आली असुन ३० अँन्टेंनांच्या माध्यमातून कार्यरत आहे.

**बिबट निवारा केंद्र, माणिकडोह :-**जुन्नर तालुक्यातील माणिकडोह ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये हे केंद्र असुन या ठिकाणी सध्या २५ बिबटे ठेवण्यात आले असुन वनविभागामार्फत त्यांची देखभाल केली जाते.

**धरणे व जलाशय :-**

जुन्नर तालुक्यामध्ये कुकडी, मिना, पुष्पावती व मांडवी या मुख्य नद्या असुन या नद्यांवर माणिकडोह व येडगाव (कुकडी नदी), पिंपळगाव जोगा (पुष्पावती नदी), वडज (मिना नदी) व चिल्हेवाडी (मांडवी नदी) ही पाच धरणे आहेत. या धरणांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात शेती जलसिंचनाखाली आली आहे.

**तमाशा पंढरी, नारायणगावः-**

तालुक्यातील नारायणगाव ग्रामपंचायत महाराष्ट्रातील तमाशा पंढरी म्हणून पूर्ण राज्यामध्ये प्रसिध्द आहे. नारायणगाव येथील तमाशा सम्राज्ञी कै. विठाबाई भाऊ मांग (नाराणगावकर) यांना राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या ठिकाणी दर वर्षी तमाशा महोत्सव भरविण्यात येतो.

**कृषी पर्यटन व निसर्ग पर्यटन**

वैविध्यपुर्ण शेतीसाठी प्रसिध्द असलेला जुन्नर ताुलका आगामी काळात कृषी पर्यटन व निसर्ग पर्यटनासाठी शहरातील पर्यटकांचा केंद्र बिंदू ठरणार आहे. शेतीमध्ये घेण्यात येणारी विविध पिके, पिकपध्दती, पशुपालन, दैनदिंन शेतीतील कामे तसेच ग्रामिण संस्कृतीचे दर्शन विविध पर्यटकांना अनुभवता येणार आहे. तालुक्यातील गोळेगाव व माणिकडोह याठिकाणी सद्दस्थितीत शेतकर्यांनी कृषी पर्यटन केंद्रे सुरु केलेली आहेत.

विविध औषधी व सुगंधी वनस्पतींचे अस्तित्त्व असलेल्या तालुक्याचे पश्चिमेकडील डोंगर रांगामध्ये असलेले दुर्गावाडी, नाणेघाट, दार्याघाट आणि पूर्वेकडील आणेघाट ही हौशी व अभ्यासू पर्यटकांसाठी महत्त्वाची निसर्ग पर्यटन केंद्रे आहेत.

**आर्वी :** हे ठिकाण जुन्नर तालुक्यात असून येथे ‘विक्रम’ हे उपग्रह दळणवळण केंद्र आहे.

**जुन्नरची लेणी :** जुन्नर मधील या लेणी लेण्याद्रीच्या पाठच्या बाजुला आहेत.पुर्वीकडच्या बाजुला एका उभ्या धारेच्या डोंगरात या लेणी आहेत.लांबुन ही लेणी दिसतच नाही. पायथ्याला बल्लाळवाडी तर हाताशी लेण्याद्री. या दोन्ही ठिकाणाहुन आपण जाऊ शकतो. इकडे माणसांचा वावर कमी असल्याने झाडी

आहे. तसेच मधमाशांचे मोठे पोळे देखिल आहेत. तेव्हा जाताना सावधान. इथे सात विहार तर एक चैत्यगृह. बाहेर अतिशय नाजुक कलाकुसर केलेले हे काम आहे. पण आतमध्ये मात्र साधे आहे.

## कळमजाई मंदिर

श्री रमेश खरमाळे (माजी सैनिक)

हे मंदिर नाणेघाटला जात असताना फांगुळगव्हाण जवळ रस्त्याच्या पश्चिमेस आहे. मंदिर या मंदिराचा जिर्नोध्दर पुर्ण न झाल्याने ते रंगरंगोटी पासुन अपुर्ण अवस्थेत दिसुन येते



## केदारश्वराची गुहा (हरिश्चंद्रगड)



हरिश्चंद्रगड मंगळगंगेच्या प्रवाहाच्या दिशेने गेल्यावर डाव्या हातास एक गुहा लागते. याला केदारेश्वराची गुहा असे म्हणतात. या गुहेत १ मीटर उंच आणि २ मीटर लांब असे शिवलिंग आहे. यात कमरभर पाणी आहे. ही गुहा खरंतर चार खांबावर तोलली होती पण सद्यःस्थितीला एकच खांब शाबूत आहे. याच गुहेत एक खोलीही आहे.

## हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर :

तळापासून या मंदिराची उंची साधारणतः सोळा मीटर आहे. मंदिराच्या प्रांगणात प्राकाराची भिंत आहे. या प्राकाराच्या भिंतीसमोरच एक दगडी पूल आहे. या पुलाच्या खालून एक ओढा तारामती

शिखरावरून वाहत येतो यालाच ‘मंगळगंगेचा उगम’ असेही म्हणतात. पुढे ही नदी पायथ्याच्या पाचनई गावातून वाहत जाते. मंदिराच्या आवारात अनेक गुहा आहेत. काही गुहा रहाण्यासाठी योग्य आहेत तर काही गुहांमध्ये पाणी आहे. या गुहांमधील पाणी थंडगार व अमृततुल्य आहे. मंदिराच्या मागे असणाऱ्या गुहेमध्ये एक चौथरा आहे. या चौथऱ्यात जमिनीत खाली एक खोली आहे. यावर प्रचंड शिळा ठेवली आहे. या खोलीत ‘चांगदेव ऋषींनी’ चौदाशे वर्ष तप केला आहे असे स्थानिक गावकरी सांगतात.

‘शके चौतिसे बारा । परिधावी संवत्सरा । मार्गशिर तीज (तेरज) रविवार । नाम संख्य ॥ हरिश्चंद्रनाम पर्वतु । तेथ महादेव भक्तु । सुरसिद्ध गणी विरुयातु । सेविजे जो ॥ हरिश्चंद्र देवता ॥ मंगळगंगा सरिता । सर्वतीर्थ पुरविता सप्तस्थान । ब्रम्हस्थळ ब्रम्ह न संडीतु । चंचळ वृक्षु अनंतु । लिंगी जगन्नाथु । महादेओ ॥ जोतीर्थासि तीर्थ । केदारांसि तुकिनाति । आणि क्षेत्री निर्मातिबंधु हा ॥’ हे चांगदेवाविषयीचे लेख मंदिराच्या प्राकारात, खांबावर, भिंतीवर आढळतात. श्री चांगदेवांनी येथे तपश्चर्या करून ‘तत्वसार’ नावाचा ग्रंथ लिहिला. येथील एका शिलालेखावर, चक्रपाणी वटेश्वरनंदतु । तस्य सुतु वीकट देऊ ॥ अशा ओळी वाचता येतात. मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरच एक छोटे मंदिर आहे. यातही महादेवाची पिंड आहे. या छोट्या मंदिरासमोरच एक भाग्न अवस्थेतील मूर्ती आहेत. त्यातील पाषाणावर राजा हरिश्चंद्र डोंबाऱ्यांच्या घरी कावडीने पाणी भरत असलेला प्रसंग चित्रित केला आहे.





## कपर्दिकेश्वर (ओतुर)...

पुणे जिल्ह्याच्या उत्तरेस जुन्नर तालुक्यात पुण्यापासून १०० कि.मी अंतरावर वसलेले ऐतिहासिक ओतूर हे गाव महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर भारतभर प्रसिद्ध झाले,ते येथील कपर्दिकेश्वर आणि बाबाजी चैतन्य महाराजांच्या समाधी स्थळामुळे. इ.स १३४७ मध्ये महाराष्ट्रात बहमनी राज्याची स्थापना झाली.त्यावेळी ओतूर गावाचा व जुन्नर परिसराचा समावेश बहमनी राज्यात होता.बहमनी राज्याच्या विघाटनानंतर निर्माण झालेल्या पाच सत्तां पैकी ओतूर परिसरावर निजामशाहिची सत्ता होती.१० नोव्हेम्बर १५६६ रोजीच्या एका फार्सी पत्रामध्ये ओतूर गावचा उल्लेख वोतूर असा आढळतो.

अशा या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या गावाच्या उत्तरेस एक कि.मी. अंतरावर झाडाझुडपातून ,डोंगरदऱ्यातून खळाळत येणाऱ्या दाक्षिण वाहिनी चंद्रकोर ष पवित्र मांडवी नदीच्या तीरावर अतिशय निसर्गरम्य परिसरात मनमोहक भव्य श्री क्षेत्र कपर्दीकेश्वराचे मंदिर वसलीले आहे. या मंदिराचे देखने रूप पाहताक्षणी भक्तांचा थकवा दूर होतो.बाबाजी उर्फ केशव चैतन्य महाराज संजीवनी समाधी मंदिर व संत तुकाराम महाराज मंदिर या त्रिस्थळी पवित्र स्थानामुळे पावन झालेले हे ठिकाण हवेहवेसे वाटनारे आहे.वारकरी सांप्रदायाचा “रामकृष्णहरि” हा मंत्रघोष याच ठिकाणी प्रथम दिला गेला,म्हणून या स्थानाला धर्मिकदृष्टया अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

उत्तमापूर हे गावचे प्राचीन नाव.या नावातच ओतूर गावाची प्राचीनता लक्षात येते.उत्तमापूर चा अपभ्रंश होत ओतूर हे नाव पुढे पुढे रूढ झाले.फार पूर्वीपासून मांडवी नदी किनारी वसलेले समृद्ध प्राचीन नगर आणि “स्वयंभू शिवलिंगाच्या” कपर्दीकेश्वर मंदिराच्या जागृत अशा ठिकाणाचा उल्लेख पुराणकालापासून होत आलेला आहे; परंतु हे स्थान खऱ्या अर्थाने प्रकाशात आले ते शिवलिंगावरील “कलात्मक” कोरड्या तांडळाच्या पिंडीमुळे आणि संत शिरोमणी तुकाराम महाराज यांना त्यांचे गुरु बाबाजी उर्फ केशव चैतन्य महाराज यानी स्वप्नात येऊन अनुग्रह देऊन उपदेश केल्यामुळे.संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुद्धा तपश्चर्येसाठी उत्तम असे ठिकाण म्हणून उल्लेख केलेला आहे. संतांची तपोभूमी म्हणून या


ठिकानाला खूप महत्व असूनही पंढरपूर ,आळंदी ,देहू यांच्या तुलनेत ओतूर हे तीर्थक्षेत्राचे स्थान मात्र महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने उपेक्षितच राहिलेले आहे.

कपर्दीकेश्वर या नावाविषयी एक आख्यायिका आहे. राघव चैतन्य स्वामींचा कार्यकाल १५ व्या शतकातील आहे. त्यांनी मांडवी नदीकिनारी घनदाट अरण्यात महर्षी व्यासांचे दर्शन व्हावे म्हणून कठोर साधनेद्वारे बारा वर्षे अनुष्ठान केले. येथील मांडवी नदीच्या तीरावर वाळूचे शिवलिंग तयार करीत असताना त्यांना एक कवाडी मिळाली. (संस्कृतमध्ये कवडीला कप्रदिक असे म्हणतात.) आपल्या तपश्चर्यचे फळ म्हणजे कवडी मिळाल्यामुळे. महाराज अतिशय दुःखी झाले. त्यांनी ती कवडी फोडली. त्यात एक अतिशय तेजस्वी, सुंदर स्वयंभु शिवलिंग मिळाले. महाराजांच्या प्रेरणेने या लिंगाचे कपर्दीकेश्वर हे नामकरण करुन या ठिकाणी लोकांनी मंदिर बांधले. तसेच नवव्या शतकातील शिलाघर राजवंशातील नववा झंझ या राजाने प्राचीन शिवलिंगावर सुंदर मंदिर उभारले होते. १२व्या शतकात संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुध्दा या तपोभूमीचा उल्लेख केला आहे. यादव राजवटीच्या अस्तानंतर अनेक लहानमोठ्या टोळयांनी स्वतंत्र राज्य निर्माण केले. यात इराणच्या मुस्लीम टोळयांनी या भागात धुमाकूळ घालून खुप संपत्ती लुटण्याबरोबर या ठिकाणची मंदिरे देखील जमीनदोस्त केली. त्या काळात याच मांडवी तीरावर घनदाट जंगलात या प्राचीन व जागृत शिवलिंगाची स्थापना महर्षी व्यासांनी राघव चैतन्य महाराजांच्या हस्ते करून मंदिर उभारणी केली. मांडवी नदी ऋषिवर्य मांडव्य ऋषींच्या आश्रमापासून उगम पावून आपल्या दोन्ही किनाऱ्यांच्या पारिसरला विलोभनीयरीत्या सुशोभीत करीन या तीर्थक्षेत्राजवळ येऊन दाक्षिणवाहिनी चंद्राकार घेऊन संथपणे आजही वाहत आहे. याच पवित्र ठिकाणी बाबाजी ऊर्फ केशव चैतन्य महाराजांनी गुरुवार वैशाख शु. द्वादशी इ.स.१५७१ रोजी वयाच्या ४७व्या वर्षी ओतुर येथे संजीवन समाधी घेतली. ठिकाणी संत चैतन्य महाराजांनी तुकाराम महाराजांना स्वप्नात गुरूपदेश करून अनुग्रह देत 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. या मंत्राचा जप आज जगभर होताना आढळतो. चैतन्यांच्या संजीवन समाधीवर वाढलेले वारुळ हे नैसर्गिक असून, दगड किंवा विटांचा यात समावेश नसूनसुद्धा शेकडो वर्षे होऊनही या समाधीची एक कण माती सुद्धा वेगळी झाली नाही. १९५३ साली गावकऱ्यांनी एकत्र येऊन कपर्दीकेश्वर देवस्थान ट्रस्टची स्थापना केली आणि १९५८ साली मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला.

तसेच चैतन्यस्वामी समाधी स्थानावर मंदिर बंधण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रात तुकाराम महाराजांचे भव्य असे मंदिर देहु व ओतुर या दोनच ठिकाणी आहे.



## मुक्ताई मंदिर नारायणगाव (जुन्नर )



ज्या गावची ओळख जगाला तमाशा पंढरी “नारायणगाव” अशी झाली त्याच गावातील असंख्य नागरिकांवर मायेच हात फिरविला तो याच “मुक्ताई”मातेन . तीच ही अतिभव्य मंदिराची छायाचित्र.

ओझर गणपती दर्शनासाठी आलात तर नारायगावातील वेशीच्या उत्तरेस अगदी 200मी अंतरावर असलेल व निसर्ग वैभव लाभलेल्या देव दर्शनाचा नक्कीच वेगळाच अनुभव घ्यायला विसरू नये.

## ग्रामोन्नती मंडळ :

सन १९४४ मध्ये गुरुवर्य रा. प. सबनीस (नानासाहेब) यांनी ग्रामोन्नती मंडळ हि संस्था उभारली. ग्रामीण भागातील जनतेचा सर्वांगीण विकास हेच ध्येय डोळयासमोर ठेवून आजतागायत हि संस्था कार्यरत आहे. तसेच आज हि संस्था जुन्नर तालुक्यातील एक बहुउद्देशीय शिक्षण संस्था म्हणून कार्यरत आहे. गुरुवर्य नानासाहेब सबनीस एक उत्तम शिक्षण तज्ञ होते. ग्रामीण भागातील शेतकरयांच्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण घेता यावे यासाठी ते नेहमीच आग्रही असत आणि हीच परंपरा आजही ग्रामोन्नती मंडळाच्या माध्यमातून चालू आहे. कृषी शिक्षण, पशुसंवर्धन, शेळीपालन, विपणन व्यवस्थापन इ. शिक्षण मंडळाच्या माध्यमातून चालविले जात आहे.

## कृषी विज्ञान केंद्र :

आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकरयांच्या शेतावर कमी वेळात सक्षमरीत्या पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हास्तरावर कार्यरत असणारया कृषी विज्ञान केंद्राची स्थापना सन २०१० साली ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव (पुणे) येथे भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्फत करण्यात आली. कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रात उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, मावळ, मुळशी तालुके येतात. कृषी विज्ञान केंद्र आपल्या कार्यक्षेत्रातील कृषीच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. जिल्ह्यामध्ये करताना कृषी विज्ञान केंद्र राज्य शासनाच्या कृषी विभाग, जिल्ह्याचा कृषी आणि ग्रामीण विभाग तसेच परीक्षेत्रामध्ये येणाऱ्या केंद्र शासनाची संशोधन केंद्रे, कृषीशी संबंधित काम करणाऱ्या गैर शासकीय संस्था आदींना बरोबर घेऊन कार्य करते. तसेच कृषी विज्ञान केंद्र शासनाचे ग्रामीण भागामध्ये काम करणारी एक सामाजिक यंत्रणा म्हणूनही ओळखली जाते.

**पिंपरी पेंढार** हे पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यातले एक गाव आहे. प्रवचनकार किसन महाराज चौधरी यांचे हे जन्मगाव आहे.सेवानिवृत्त शिक्षक किसन महाराज चौधरी यांनी पिंपरी पेंढार येथे माऊली सेवा संस्था या नावाचा वानप्रस्थाश्रम काढला आहे.

## "आळे"

आपल्या भारताला हजारो वर्षांचा इतिहास आहे. गावा-गावांत जुने संदर्भ स्मृतीमधुन ठरविले जातात. ऐतिहासिक स्थळांचे भग्नावेशेष आढळतात. वीरगळ मंदिरे, शिलालेख, धार्मिक स्थळ, विहीर, बारव, धर्मशाळा, समाधी स्थळ इत्यादी आढळतात. त्यांचा शोध घेवून त्यांचे ऐतिहासिक संदर्भ शोधण्याचा, त्यानुसार स्थानिक गावचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला जातो

"आळे" कसबा आळे धार्मिक महत्त्व, पेशवाईचा वारसा जपणारे पेशवेकालीन आळे खिंडीतील लढाईचा वारसा, स्वामी कादंबरीतील उल्लेख आगरमळयातील विहीरीचा भूयारीमार्ग, ऐतिहासिक पाऊलखूणा, आहिल्याबाई होळकरांच्या काळातील महादेवाचे मंदिर, पांदीचा गणपती, कबीर मठ, मठातील ऐतिहासिक वंशावळ, राम मंदिरास मिळालेली ऐतिहासिक ठश्यांचा वारसा जपणारे आळे, कसबा आळे, होळकरांचे आळे, आडांचे आळे, रेडा समाधी मंदिराचे आळे, जिजाऊंचे वतन जपणारे आळे, तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सुवर्ण महोत्सव गाठणारे आळे, जागतिक किर्तीचे चित्रकार देणारे आळे, असे आळे गाव, ता. जुन्नर, जि. पुणे, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय व जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवणारे २१ व्या शतकात पर्यटनाचे धार्मिक, अध्यात्मिक, टप्पा गाठणारे ठरणार आहे यात शंका नाही.

"'कसबा' हा अरेबिक शब्द असून तो 'कस्ब' या शब्दा पासून निर्माण झालेला आहे. कस्ब याचा अर्थ कौशल्य, कला, धंदा होय. जेथे कसबी कारागीर, व्यापारी यांची वस्ती अधिक आहे असा परगणा किंवा महाल या विभागातील मोठे गाव म्हणजे कसबा होय. काही वेळा परगणा किंवा महाल या विभागाचे मुख्य ठाणे मुख्यालय जेथे असे व त्या बरोबरीने बाजारपेठ असलेले मोठे गाव यालाही कसबा म्हणत. आर्थिक व्यवहार व आकारमान या दृष्टीने कसबा हा खेडेगावापेक्षा लहान होता. कायमस्वरुपी बाजारपेठ हे कसब्याचे प्रमुख वैशिष्टये होते."

आळे हे गाव पुर्वीचे 'कसबे आळे' नावाने प्रसिद्ध होते. हे गाव पुण्याच्या उत्तरेस पुणे -नाशिक रस्त्यावर पुण्यापासुन ५४ मैलावर (९६कि.मी.वर) आहे.अहमदनर-कल्याण स्त्यावर आळेफ़ाटा व आळेफाट्यापासुन पुर्वेकडे २ कि.मी.वर आळे गाव आहे. येऊनिया उतरिले आळेचिये बनी। पशु तये स्थानी शांत जाहला॥

संत श्रेष्ठ नामदेवमहाराजांनी आळे येथील समाधी स्थानाचे वरीलप्रमाणे वर्णन आपल्या अभंगामध्ये केलेले आहे. आळंदीच्या तथाकथित धर्म मार्तंडानी श्री ज्ञानेश्वरमहाराज व त्यांच्या भावंडांना धर्मात परत घेण्यासाठी प्रमाण म्हणून पैठण येथील धर्म सभेचे शुध्दीपत्र मागितलेवरुन ही भावंडे पैठण येथील धर्म सभेमध्ये गेले असताना त्यांना अनेक सत्वपरिक्षांना तोंड द्यावे लागले. त्याचप्रसंगी वाकोबा नावाचा कोळी आपल्या गेनोबा नावाच्या रेड्यास घेऊन जात असताना धर्म सभेतील एका धर्म पंडिताने ज्ञानेश्वरमहाराजांना त्या रेड्याचा तुझा आत्मा एकच आहे का? हे सिध्द करुन दाखव असे सांगितलेवरुन ज्ञानदेवांनी रेड्याच्या मस्तकावर हात ठेवून वेद उच्चारण्याची आज्ञा केली. लगेचच रेड्याच्या मुखातून ऋगवेदाच्या पुढील श्रृती बाहेर पडल्या-

ॐ अग्निमुळे पुरोहित यज्ञस्य देव मृत्विजम। घेतार रत्न धाततम॥

पशुमुखे वेदाच्या श्रृती। वाढवा किर्ती तूमचीये॥

-संत निळोबाराय

तेव्हापासुन सदरचा रेडा ज्ञानेश्वरमहाराजांचा प्रथम शिष्य झाला. या चमत्काराने प्रभावित होऊन धर्मसभेने ज्ञानदेवांना शुध्दीपत्र बहाल केले. शुध्दीपत्र घेऊन ज्ञानदेव व सर्व भावंडे पैठणवरुन आळंदीकडे निघाले असताना रेडा व वाकोबा कोळीसुध्दा त्यांच्या बरोबर होते. पुढे नेवासा ह्या ठिकाणी ज्ञानेश्वरीचे लेखन केल्या नंतर श्री ज्ञानेश्वरमहाराज, निवृत्तीनाथ, सोपानदेव व मुक्ताई, रेडा व वाकोबा कोळी हे सर्व बरोबरच्या संतासमवेत आळे गावाच्या उत्तरेस असलेल्या अकलापूर या गावी आले तेथून संतवाडी येथील चौऱ्याच्या डोंगरावरती विसावा घेत असताना समोर दिसणाऱ्या भुमीचे निरीक्षण करीत असताना श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी वर्तुळाकार अशी निसर्गसंपन्न भुमी पाहून या भूमीचे आळे असे नामकरण केले याच भूमीस पुर्वी अलंकापुरी म्हणून संबोधीत असत. सदर ठिकाणी रेड्याने श्री ज्ञानेश्वरमहाराजांकडे आपणाला याच ठिकाणी समाधी द्यावी अशी इच्छा प्रदर्शित केली. त्यावळी ज्ञानदेवांनी पुढील भविष्य जाणुन आजच्या

समाधीस्थळी येऊन शके १२१२ (इ. स. १२९०) माघ वद्य १३ (त्रयोदशी) या दिवशी स्वहस्ते या रेड्यास समाधी दिली. या समाधीला श्री ज्ञानेश्वरमहाराज, निवृत्तीनाथ, सोपनदेव, मुक्ताई या चार भावंडांचे हात लागलेली महाराष्ट्रातील ही एकमेव समाधी आहे.

ही समाधी अत्यंत प्राचीन असुन वारकरी सांप्रदयामध्ये या तिर्थक्षेत्राला अत्यंत महत्त्व असुन आळंदी, पंढरपूराच्या खालोखाल वारकरी सांप्रदयात या तिर्थक्षेत्राची गणना केली जाते. ज्या वारकऱ्यांची पंढरपूर आळंदीची वारी चुकते ते वारकरी आळयाची वारी करुन पंढरपूर - आळंदीच्या वारीचे पुण्य पदरात घेतात.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील भाविक शुद्ध व वद्य एकादशीला दर्शनासाठी येत असतात. प्रत्येक एकादशीला व व्दादशीला गावागावचे भाविक या ठिकाणी अन्नदानाचे कार्यक्रम करीत असतात. चैत्र वैद्य एकादशीला देवाची (३) तीन दिवस यात्रा भरत असते. दुसऱ्या दिवशी सगळया वारकऱ्यांना व्दादशीचे अन्नदान संतवाडी, कोळवाडी व डावखरवाडी यांचे करुन करण्यात येते त्यानंतर दुपारी महाराष्ट्रातील नामवंत पैलवानांचा आखाडा गाजतो व शेवटच्या दिवशी दहीहंडी फोडून यात्रेची सांगता होते. या समाधीस्थळी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन त्याच प्रमाने वारकऱ्यांच्या सोई सुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून देवस्थान ट्रस्टने केलेले प्रयत्न पाहून महाराष्ट्र शासनाने सन - २००३ साली देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा 'क' दर्जा दिलेला आहे.



श्री संत ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्या रेड्यामुखी वेद बोलवले त्या रेड्याची समाधी पुणे जिल्यातील जुन्नर तालुक्यातील आळे गावी आहे.

आळे गाव हे पुणे नाशिक हायवेवरुन ३ कि. मी. अंतरावर असून रेडासमाधी मंदिर आहे. मंदिराच्या दक्षिणबाजुला कोळवाडी गाव असून मंदिराच्या उत्तरेला संतवाडी गाव आहे. मंदिराच्या पुर्वेला ग्रामदैवत कानिफनाथाचा डोंगर असून पश्चिमेला आळेफाटा हे मोठे व्यापारी क्षेत्र असलेले पुणे नाशिक हायवेवरचे ठिकाण आहे.

## गुळुंचवाडी

आळेफाटय़ाहून साधारण १८ किलोमीटरवर गुळुंचवाडी हे गाव आहे. हे गाव ओलांडताच लगेच अणे घाट सुरू होतो. या घाटाची दोन-चार वळणे घेताच डाव्या हाताला दरीत एक दृश्य पाहणाऱ्या प्रत्येकाचे कुतूहल चाळवते.

या डोंगराच्या एका शिरेवरच एक भलामोठा नैसर्गिक बोगदा तयार झालेला दिसतो. एखाद्या पुलाच्या कमानीप्रमाणे त्याची ही रचना. उत्सुकतेपोटी हे स्थळ पाहण्याची इच्छा होते. अनेक लोक हा चमत्कार थांबुन बघत असतात.

कौरव-पांडव युद्धात पांडवांपैकी कुणाच्या तरी एकाच्या बाणाचा नेम चुकला अन् इथं डोंगराला भोक पडलं! असे स्थनिक लोक सांगतात. पण त्यामागे वेगळे कारण आहे. पाणी डोंगरावरुन वाहत – घर्षण करत तिथिन जाते त्यामुळे हा नैसर्गिक बोगदा तयार झाला आहे.

## श्री रंगनाथ स्वामी महाराज मंदिर आणे

आणे या ठिकाणी श्री रंगनाथ स्वामी यांचे मंदिर असुन याठिकाणी मोठी यात्रा भरत असुन मोठया प्रमाणात भाविक वर्षभर दर्शनाला येत असतात.

## Yashwantrao Chavan Tourism Centre, Junnar

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ माध्यमातुन आणि मा. आमदार श्री. वल्लभशेठ बेनके ह्यांच्या संकल्पनेतुन साकारत आहे 'यशवंतराव चौव्हान पर्यटन केंद्र'. जागतिक दर्जाचे हे पर्यटन केंद्र पुणे जिल्ह्यातील 'जुन्नर' तालुक्याच्या येडगाव धरणाच्या जलाशयाजवळ आकार घेणार आहे. नामदार वल्लभशेठ बेनके ह्यांच्या प्रयत्नातुन आणि मा. शरदचंद्रजी पवार व मा. अजितदादा पवार ह्यांच्या पाठिंब्यामुळे महाराष्ट्रशासनाने ह्या प्रकल्पासाठी ९७ कोटी रुपये मंजुर केले आहेत. शिवनेरी, लेण्याद्री आणि ओझर पासुन जवळ असलेल्या ह्या प्रकल्पामुळे जवळ जवळ ३० लाख पर्यटक भेट देतील आणि ४० हजार स्थानिकांचा रोजगार देखील वाढेल..

## जुने खंडोबा मंदिर-वडज





## कोपरा-मांडवे- निसर्ग पर्यटनाचे नवीन ठिकाण

जुन्नरची समुद्र सपाटीपासुनची उंची सुमारे २३०० फुट. हा तसा घाटमाथ्यावरचा परिसर पण पश्चिमेच्या बाजुला कोकणाचा फील देणारा निसर्ग अचंबित करून सोडतो. जुन्नर मधुन २ राष्टीय महामार्ग जातात. एक पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग न. ५० आणि आणि एक मुंबई-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग २२२, हे दोनही महामार्ग ज्या ठिकाणी एकमेकाला भेटतात तीथे आळेफाटा गाव आहे. जुन्नरमधील हे मध्यवर्ती ठिकाण पुणे, नाशिक, नगर आणि कल्याण या चारही शहरांकडून येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना स्वागत आणि आभार म्हणुन पुढील प्रवासाच्या शुभेच्छा देत अविचल उभे आहे. आजच्या मळून गेलेल्या पर्यटन स्थळांना नवा कोरा पर्याय म्हणुन जुन्नर एक उभरते पर्यटन स्थळ म्हणुन समोर येत आहे. त्यासाठी दळणवळणाच्या दृष्टीने आळेफाटा हे महत्वाचे ठिकाण आहे. आळेफाटा जवळुन साधारण १८ किमी कल्याणच्या बाजुला केले की उदापुर गाव येते आणि उदापुर पासुन उत्तरेला १९-२० की मी वर कोपरा मांडवे ही गावे आहेत. तसे तर आळेफाटा पासुन तासाभराच्या अंतरावर आपण कोकणात आलेले असतो. लाल माती...खळखळ वाहणारे झरे, भाताची खाचरे, कौलांचा ढीग वाटावा अशी घरांची बसकण असलेली गावे, उंच डोंगर आणि खोल दऱ्या.. उदापुर पासुन एक घाटवाट आपल्याला उत्तरेकडे घेऊन जाते. ५ की मी वर मुथाळणे घाट लागतो. नागमोडी वळणे आपल्याला उंचावर घेऊन जात असतात. एका उंच टोकावर येऊन घाट पुन्हा उतरणीला लागतो. आपण आपोआप तीथे थांबतो. जरा पाठमोरे झालो तर जुन्नरचे विस्तीर्ण मैदान आपले लक्ष वेधून घेते. यडगावचा जलाशय इथून स्पष्ट दिसतो. याच ठिकाणी रात्रीच्या वेळी उभे राहिलो तर एखादे शहर वाटावे एवढ्या गर्दीने दिव्यांचा झगमगाट दिसतो. याच घाट माथ्यावर एक वाघाचे दगडी शिल्प देव म्हणुन ठेवले आहे. वाघाची पुजा...निसर्गाची पुजा. निसर्गापुढे नतमस्तक होऊन जरा पुढे निघालो तर आता चढण संपुन घाट उतरणीला लागतो. आता प्राकृतिक बदलासोबत सगळेच बदल जाणवायला लागतात. घाटाच्या दक्षिणेकडचा परिसर आणि उत्तरेकडचा परिसर यात भौगोलिक फरकासोबत बाकी पण बरेच बदल जाणवायला लागतात. रात्रीच्या वेळी दक्षिणेकडे दिसणारा झगमगाट उत्तरेकडे विरळ होत जातो. आतापर्यंत असणारी सेलफोनची रेंज गायब होते. दक्षिणेकडचे

आयुष्य, त्याचा वेग सारेच मंदावून जाते आणि ऐसपैस आरामशीर जग आपले स्वागत करायला तत्पर दिसते. मुथाळणे गावच्या थोडं आधी एक रस्ता उजवीकडे जातो..१० मिनिटाच्या अंतरावर दोन डोंगरांच्या मधे तुटलेला कडा दिसायला लागतो..जरा पुढे गेलो की त्यात भीती वाटावे असे पाणी दिसायला लागते. हिच चीलेवाडी पाचघर धरणाची मागची बाजु. जरा पुढे गेलो की एक वस्ती लागते. तीथे वाहन उभे करून समोर दिसणाऱ्या टेकडीकडे जाणारी पाऊलवाट तुडवत निघायचे. आपल्या बाजुने जरी टेकडी वाटत असली तरी पलीकडच्या बाजुने तो मोठ्या डोंगराचा शेंडा असतो. जसे जसे आपण टेकडीच्या डोक्यावर जायला लागतो तसतसे चीलेवाडी पाचघर धरणाचे छाती दडपून टाकायला लावणारे अक्राळ विक्राळ , विराट दर्शन आपल्याला थोडं मागेच उभं राहायला भाग पडते. आपण उभे असतो त्याच्या उत्तरेला बरडेश्वराचे शिखर आणि त्याच्या पोटाला छोटो छोटी गावे आणि बाजुला वाहणारे झरे आपल्याला नेत्रसुखद अनुभव देतात. दूरवरून वाहत येणारी मांडवी नदी जुन्या चीलेवाडीच्या डोहात आणि आताच्या जलाशयात आपली पूर्वीची समर्पणाची भावना बदलत नाही. इथले आदिवासी बांधव मग चीलेवाडीच्या डोहाविषयी काही गुढ आणि काहीशी औषधी गंधकाची माहिती देतात. अनुभवाचे बोल ऐकुन मागे फिरावं..पुन्हा बोलक्या रस्त्याला येऊन उजवीकडे वळलो की मुथाळणे गावात पोहोचतो. याच गावात "टपाल" चित्रपटाचे चित्रीकरण झाले आहे. मुथाळणे गावाला वळसा घालुन रस्ता आपल्याला पुढे घेऊन जातो. थोड्याश्या डोंगर पठारावरून पुन्हा घाटवाट खाली उतरायला लागतो. उतरत असताना खाली दरीत मांडवी नदीचा खळाळता प्रवाह आणि काठावरचे कोपरा आणि मांडवे आपल्याला दिसायला लागते. या गावात "टिंग्या" चित्रपटाचे चित्रीकरण झाले आहे. याच गावांमधुन पुढे जाणारा रस्ता आपल्याला जुन्नर अकोले सीमेवर असणाऱ्या रांजण किल्ला आणि कोंबड किल्ल्याकडे घेऊन जातो आणि तसाच पुढे अकोल्यातील ऐतिहासिक गाव फोफसंदीला पण जातो. हिवाळा आणि उन्हाळयात जरी हा परिसर जुन्नरचाच भाग वाटत असला तरी पावसाळयात मात्र इथे कोकण अवतरते. जणु कोकणचा काही भाग मामाच्या गावाला आल्यासारखा भास मला होतो. आणि पुन्हा पुन्हा पावले जुन्नरच्या "कोकणाकडे " वळतात. असाच अनुभव जुन्नर शहराच्या पश्चिमेला असणाऱ्या आंबे हात वीज च्या पठारावरही येतो. पण तिकडे जाण्यासाठी रस्ता जरा दुर्गम आहे. पण राष्ट्रीय महामार्गाच्या जवळ कोकणाचा अनुभव घ्यायचा

असेल तर कोपरा मांडवे, मुथाळणे या परिसराला नक्की भेट द्या. हो पण एक नम्र विनंती. जाताना निसर्गाचा आनंद घ्यायला जा..निसर्गाचा मान-आदर ठेवा. सोबत काही खाण्याचे पदार्थ प्लास्टिक मधुन घेऊन जात असाल, पाण्याच्या बाटल्या घेउन जात असाल तर आठवणीने पुन्हा परत घेऊन या...नाहीतर आजचा सुंदर निसर्ग आपल्या बेपर्वाईने विद्रूप होईल आणि मग त्याने एकदा जरी नाराजी व्यक्त केली तर काय होते हे आपण बऱ्याच ठिकाणी पाहिले आहेच. आपल्या जुन्नर पर्यटन विकास संस्थेमार्फत ही निसर्ग पर्यटनाची ओळख सर्व निसर्ग प्रेमींसाठी आणि सतत नाविन्याच्या शोधात असणाऱ्या भटक्या पावलांसाठी

मनोज हाडवळे

जुन्नर पर्यटन मॉडेल

जुन्नर पर्यटन विकास संस्था

हचीको टुरिझम

पराशर कृषी आणि ग्रामीण पर्यटन

## भोलेनाथा चे सालोबा मंदिर


जुन्नर पासुन जवळच १० कि.मी अंतरावर असलेल्या राळेगण व शिंदे यांच्या मध्यवर्तीत असलेले श्री भोलेनाथा चे सालोबा मंदिर. येथून जुन्नरला लाभलेल्या चार वैभवशाली किल्यांचे दर्शन घडते. याच मार्गाने जगप्रसिद्ध पठारावर जाता येते की ज्याची ख्याती अंबे हतविज नावाने ओळखली जाते.

## वरसुबाई देवस्थान, हिवरे पठार -



सर्व भाविकांचे व विशेष करुन महाराष्ट्रातील आदिवासी बांधवांचे श्रध्दास्थानअसलेले व अत्यंत उंचावर वसलेले देवीचेमंदिर.

# शिरूर तालुका




राज्याच्या पुणे जिल्ह्यातील शिरूर हे एक ऐतिहासिक शहर आणि तालुका.

घोड नदीच्या किनाऱ्यावरील हे शहर पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवर वसले आहे. घोड नदीच्या सान्निध्यामुळे हे शहर घोडनदी या नावानेही ओळखले जाते. शहराच्या नियोजनासाठी नगरपालिका आहे.

शिरूरला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. भौगोलिकदृष्ट्या पाहिले असता, हा तालुका अहमदनगर राज्य मार्गावरील नैऋत्येकडील २४ किलोमीटरवरील भीमा नदीपासून सुरू होतो आणि त्याच मार्गावर ५० किलोमीटरवरील घोड नदीच्या तीरावर संपतो.

## पाबळ विज्ञान आश्रम - काम करत शिकण्याची गोष्ट

डॉ. योगेश कुलकर्णी, महाराष्ट्र टाइम्स, शनिवार, २२ फेब्रुवारी २०१४

शिक्षण अर्थपूर्ण बनवण्यासाठी, त्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकले पाहिजे. प्रत्यक्ष काम करत शिकणे ही शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी तीन दशकांपूर्वी पाबळ येथे सुरू झालेले 'विज्ञान आश्रम' देशभर पोचले आहे.

ती एका गावाची गोष्ट नाही. तशी त्याची सुरुवात एका गावात तीस-एक वर्षांत झाली; परंतु ती देशातील एकशेबावीस गावांची गोष्ट बनली आहे. गोष्ट केवळ गावापुरती मर्यादित नाही. त्याची व्याप्ती त्याहून अधिक आहे. ती जगण्याशी संबंधित आहे. शिकण्याशी संबंधित आहे. खरे तर जगता-जगता शिकण्याची, शिकता-शिकता जगण्याची आणि ग्रामीण विकासाच्या वेगळ्या प्रारूपाची ती गोष्ट आहे. शिक्षणाद्वारे जीवनावश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांना देऊन त्याद्वारे ग्रामीण विकास घडवून आणण्याच्या संकल्पनेतून तीन दशकांपूर्वी डॉ. श्रीनाथ कलबाग यांनी पुण्यापासून साठ किलोमीटर अंतरावर असलेल्या पाबळ येथे 'विज्ञान आश्रम' सुरू केला. त्या संकल्पनेचे मूर्त स्वरूपात रूपांतर झाले असून, अरुणाचल प्रदेशापासून केरळपर्यंत त्याचा लौकीक गेला आहे.




ज्या पाबळमध्ये हा आश्रम आहे, तेथील उत्पादकता

वाढल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. एका अर्थाने ‘विज्ञान आश्रमा’चे गृहितक प्रत्यक्षात आले आहे. ‘ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल, तर उत्पादकता वाढवावी लागेल आणि त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे’ असे विज्ञान आश्रम मानतो. मात्र, केवळ तंत्रज्ञान विकसित करून उपयोगाचे नाही, तर ते लोकांपर्यंत जायला हवे आणि अशा प्रकारच्या तंत्रज्ञानावर आधारित सेवा देणारे उद्योजक निर्माण व्हायला हवेत. असे उद्योजक घडवण्याचा प्रयत्न ‘विज्ञान आश्रम’ करत आहे.

तंत्रज्ञान लोकांपर्यंत म्हणजेच समाजापर्यंत पोचवण्यासाठी विज्ञान आश्रमाने ‘शिक्षण’ हे माध्यम निवडले आहे. शिक्षण अर्थपूर्ण बनवण्यासाठी, त्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकले पाहिजे. प्रत्यक्ष काम करत शिकणे ही शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. ‘विज्ञान आश्रमा’तील विद्यार्थी तंत्रज्ञानावर आधारलेले विविध प्रकल्प प्रत्यक्ष काम करत शिकतात. सोलर दिवे तयार करणे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांसारखी तंत्रे वापरून शेती उत्पादन घेणे, बांधकामाची नवीन तंत्रे वापरून शिकणे, खाद्य पदार्थांची निर्मिती करणे आदी बाबी ते काम करता करता शिकतात. त्यालाच कार्यकेंद्री शिक्षण म्हटले जाते. ते शिक्षण म्हणजे व्यवसाय शिक्षण आहे असे कोणाला वाटू शकेल. मात्र, एखादे काम करताना विद्यार्थ्यांना त्याच्या अनुषंगाने विविध विषयांतील संकल्पनांची ओळख करून देण्यावर तेथे भर दिला जातो. उदाहरणार्थ, इलेक्ट्रिकल उपकरणांची दुरुस्ती करताना भौतिकशास्त्रातील संकल्पना शिकता येतात. शेतीत पीक घेताना जीवशास्त्र, गणित आदी अनेक विषयांतील कल्पना सहजपणे शिकता येतात. काम करता करता संकल्पना स्पष्ट करून शिकवले, की ते विद्यार्थ्यांना कंटाळवाणे वाटत नाही. नेहमीच्या पुस्तककेंद्री शिक्षणात ज्यांना रुची नाही आणि त्यामुळे जे शैक्षणिक प्रगती करू शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना घेऊन ‘विज्ञान आश्रमा’ने ही संकल्पना सिद्ध केली आहे. तेथून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेले शेकडोजण स्वतःचे व्यवसाय करत आहेत.



वास्तविक नेहमीच्या शाळांमध्येच प्रत्यक्ष अनुभवातून प्रकल्पातून शिक्षण दिल्यास ते अधिक उपयोगी ठरू शकते. म्हणूनच ‘विज्ञान आश्रमा’ने ‘मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख’ हा कार्यक्रम तयार केला. चार राज्यांतील शंभरहून जास्त शाळांत तो राबवला जात आहे. आठवी ते दहावी वर्गांतील विद्यार्थी आठवड्यातील एक पूर्ण दिवस विविध उत्पादक कामे करतात. त्यांना त्या कामाचे प्रशिक्षण देण्यासाठी संबंधित गावातील अनुभवी कारागिरांना ‘मानद शिक्षक’ म्हणून बोलावले जाते. विद्यार्थी शाळेतील व समाजातील विविध कामे सेवा म्हणून देतात. प्रत्येक काम महत्त्वाचे असते आणि त्यासाठीचे कौशल्य उपयुक्त ठरते हे त्या उपक्रमातून विद्यार्थ्यांवर बिंबवले जाते. विद्यार्थ्यांकडून कोणत्या प्रकारची उत्पादक कामे करून घेता येतील, त्यांमधून कोणत्या संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवता येतील, त्यासाठी कोणत्या साधनांचा वापर करता येईल आणि ही साधने कशी उपलब्ध होतील आदी अनेक प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्नही केला आहे. त्या सर्व प्रश्नांच्या उत्तरासाठी विज्ञान आश्रमाने www.learningwhiledoing.in ही वेबसाइटही विकसित केली आहे. उत्पादक कामे आणि त्यांच्याशी संबंधित रिसोर्सेस (व्हिडिओ, पॉवर पॉइंट, मॅन्युअल, कृती इत्यादी), मुक्त शैक्षणिक संसाधने (ओ ई आर) म्हणून उपलब्ध आहेत. त्याचा तपशीलही पुरवला जातो. उत्पादक कामे करतानाही सर्जनशीलता, निरीक्षणे यांवर भर दिला जातो. त्यातूनही काही नवीन प्रयोग जन्माला येतात.




उदाहरणार्थ, भिवंडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांनी लाकूड, एलपीजी, केरोसिन अशी वेगवेगळी इंधने वापरून खिचडी तयार केली. कोणते इंधन

किफायतशीर, चुलीची उत्पादकता, ज्वलनक्षमता यांचा अभ्यास त्या विद्यार्थ्यांनी केला. पारंपरिक कामाचे प्रशिक्षण देतानाच विज्ञान उलगडण्याच्या अशा प्रयत्नांची दखल घेऊन पवई येथील ‘आय आय टी’ने ‘विज्ञान आश्रमा’ला दोनशे ‘आकाश’ टॅब्लेट विकसित केले. पाबळच्या भैरवनाथ विद्यामंदिरातील आठवीच्या विद्यार्थ्यांना हे टॅब्लेट दिले गेले. शाळेमधील कार्यशाळेत प्रत्यक्ष कृती करायची व त्या संदर्भातील संकल्पना टॅब्लेटवरून अभ्यासायच्या असा हा प्रयोग आहे. शिंदवळे येथील नववीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला आवश्यक असलेले संपूर्ण वायरिंग केले. वायरिंगचे काम करतानाच विजेची संकल्पना, विजेचा इतिहास, एडिसनचे चरित्र, ओहमचा नियम, वायरींचे प्रकार आदी संकल्पना त्यांना शिकवण्यात आल्या. त्यांनी आपण केलेल्या कामाचा जमाखर्च काढला आणि झालेल्या कामाचा अहवाल मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांत लिहिला. त्या प्रयोगात विद्यार्थ्यांनी वायरिंगचे काम केले, त्याच्याशी संबंधित विज्ञानाचे अध्ययन केले, जमाखर्च लिहिण्याचे प्रशिक्षण घेतले आणि विविध भाषांतील अहवाल लेखनही केले. पोखरी शाळेतील विद्यार्थ्यांनी गावाच्या पाण्याचा वर्षाचा हिशोब मांडला. त्यांनी पर्जन्यमापक तयार केले, त्याद्वारे पडणाऱ्या पावसाचे मापन केले, गावातील ओढ्या-नाल्यांतून वाहणारे पाणी मोजले, ग्रामपंचायतीमध्ये जाऊन जनगणनेची माहिती मिळवली, प्रत्येक प्राण्याला साधारण किती पाणी लागते त्याची माहिती इंटरनेटवरून घेतली आणि त्या सर्व नोंदींद्वारे गावातील पाण्याचा जमाखर्च सादर केला. संगमनेर मधील ‘मालपाणी शाळे’तील विद्यार्थ्यांनी मेथी आणि पालक यांची पिके नुकतीच घेतली. अभ्यासक्रमातील बीज प्रक्रिया, खते, सिंचन पद्धती यांचा अभ्यास त्यांनी पीक घेताना केला. आलेली भाजी विकून त्यांनी पिकाचा जमाखर्च मांडला. कार्यकेंद्री शिक्षण अशा प्रकारे बहुआयामी असते.

निव्वळ हाताने काम केले, की आपोआप बुद्धीला चालना मिळत नाही. त्यासाठी केलेल्या कामावर विचार करायला लागतो. का, कसे, कधी, केव्हा, कुठे असे प्रश्न विचारावे लागतात. प्रश्न पडायला लागले, की उत्तर शोधता येतात. बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. त्यामुळे त्याची लाज वाटण्यापेक्षा विज्ञान आश्रमाने ‘हमे पता नहीं, पर ढुँढ लेंगे!’ (एचपीएनपीडीएल) ही संज्ञा तयार केली आहे.

महात्मा गांधींनी 'नई तालीम'द्वारे अशा कृतिशील शिक्षणाचा विचार मांडला होता. 'विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता विकसित करण्याची जलद पद्धत म्हणजे त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देणे' असे गांधीजी म्हणत. उत्पादक कामातून शिक्षण देण्याच्या त्यांच्या विचारांकडे दुर्दैवाने आपण दुर्लक्ष केले. डॉ. श्रीनाथ कलबाग यांनी गांधीजींचा हा शिक्षण विचार पुढे नेत तंत्रज्ञानावर आधारित उत्पादक कामे शाळेत शिकवण्याची संकल्पना प्रत्यक्ष राबवली. एरवी विद्यार्थ्यांना न आवडणारे गणित, विज्ञान आदी विषय प्रत्यक्ष कामाद्वारे शिकताना त्यांना आवडू लागतात हे त्यांनी स्पष्ट करून दाखवले.

उत्पादक कामातून शिकणे, प्रकल्पातून शिकवणे यासाठी शिक्षकाकडे विशेष कौशल्ये लागतात हा समज होता. वास्तविक 'ओ ई आर'च्या मदतीने कुठल्याही शिक्षकाला असे शिक्षण देणे शक्य आहे. 'ज्या कल्पनेची वेळ आली आहे तिला कोणीही थोपवू शकत नाही' असे म्हणतात. नवीन शैक्षणिक संशोधनामुळे ज्ञानरचनावाद, प्रकल्पातून शिक्षण, कृतियुक्त शिक्षण या कल्पना स्वीकारल्या जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे त्या सर्व कल्पनांच्या पुढे जाऊन शोषणमुक्त, अहिंसात्मक समाजासाठीची 'नई तालीम'ची वेळ आली आहे असे वाटते.

**विज्ञान आश्रम,**

मु. पो. पाबळ, ता. शिरूर,

जिल्हा – पुणे, पिन कोड – ४१२४१३

दूरध्वनी – ०२३८ २९२३२६

**संपर्क -** रजनिश शानबाग –९५७९७३४७२०

ranajeetpallavi@gmail.com

**मस्तानीची समाधी** युवराज पाटील

**पाबळ :** हे गाव शिरूर तालुक्यात असून शिक्रापूर पासून २० कि.मी.अंतरावर आहे.या ठिकाणी श्रीमंत बाजीराव पेशवे यांची मस्तानी हीची ऐतिहासिक कबर आहे.मस्तानी ही हिंदू राजाची मुलगी होती.

पुणे जिल्हा हा ऐतिहासिक घडामोडीचे एक प्रमुख केंद्र आहे.. छत्रपती शिवरायांच्या जन्मापासून ते महात्मा गांधीच्या वास्तव्यापर्यंत अनेक घटनांचे साक्षीदार असलेला जिल्हा म्हणून इतिहासांच्या पानात नोंद आहे.. असंच एक इतिहासातलं पान नुकतंच पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील 'पाबळ' या गावी जाऊन उलगडता आलं...

इतिहासाच्या दृष्टीने हे पान काहीसं दुर्लक्षित होतं आणि आहे.. ते आजही प्रकर्षाने जाणवते.. हे इतिहासातील पात्र काही वाहिन्यांनी कथानक म्हणून निवडलं त्याला चांगला टीआरपीही घेतला.. पण प्रत्यक्षात या पात्राची उपेक्षा मृत्यूनंतरही जवळजवळ तीन शतकांनंतरही कायम आहे. का झाली उपेक्षा.. काय गुन्हा केला होता.. तो तीन शतकांनंतरही पुसला जात नाही.. तो गुन्हा होता एका जिगरबाज योद्धय़ावर भरभरून प्रेम केल्याचा.. आता तुम्हाला उकल झाली असेल मी कोण्या ऐतिहासिक पात्रासंदर्भात बोलतोय ते.. हो.. तेच.. बाजीरावावर जिवापाड प्रेम करणाऱ्या मस्तानीवर..!

मला इतिहासात काय झाले हे पुन्हा तुम्हाला सांगायची गरज नाही.. ते ठिकाण बघून मन पिळवटून गेलं.. घालमेल झाली ते व्यक्त करण्यासाठी या माझ्या भावना आहेत. माझं मन त्या इतिहासातील घटनांचा अंदाज बांधत थेट शनिवारवाडय़ात गेलं. मस्तानी दरवाज्याच्या कोपऱ्यात येऊन थांबलं.. आरासपानी सौंदर्याची मालकीण या वाडय़ाच्या कोपऱ्यात आपला गुदमरलेला श्वास घेऊन का राहिली असेल..



काय करावें तें आतां ! झालें न येसें बोलता !!

नाहीं दोघांचिये हाती ! गांठी घालावी एकांती !!

या अभंगाच्या ओळी तिच्या मन:स्थितीचे भान



टिपण्यासाठी अतिशय चपखल बसतात.

तो एकांतवास मिळवण्यासाठी दोघांनाही किती यत्न करावे लागले असतील.. निरपेक्ष प्रेमाला समाजाच्या विखारी नजरांसमोर जावे लागले असेल.. त्यातूनच बाजीरावांनी मस्तानीला पाबळ या ठिकाणी ठेवण्याचा निर्णय घेतला असावा. पाबळ हे गाव भौगोलिकदृष्टय़ा डोंगराळ भागात मोडते.. पुण्यापासून जवळपास ५० ते ६० किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. पाण्याची वानवा असलेला (आज ती परिस्थिती नाही) भाग असल्यामुळे त्याकाळी फार मोठी लोकवस्ती त्या ठिकाणी असण्याची शक्यता फारच कमी वाटते. त्यामुळेच इथे दोघांना एकांतवास मिळेल म्हणून हे ठिकाण निवडले असावे.. पाबळ गावच्या वेशीपासून अर्धा किलोमीटरच्या अंतरावर हा भव्य वाडा बांधल्याच्या आज फक्त खुणा दिसतायत. आता तो भग्न अवस्थेतील वाडा आपल्या शेवटच्या घटका मोजताना दिसतो आहे.

हिर-रांझा.. लैला- मजनू.. यांचा प्रेम इतिहास गौरवाने सांगितला जातो.. थोडय़ाफार प्रमाणात साम्य असलेल्या या प्रेमाला मात्र इतिहासातही 'एक ठेवलेली बाई' अशा अतिशय हिनकसपणे रंगवलं जातं. खरं तर एक क्रांतिकारी प्रेमकहानी म्हणून हे इतिहासातील सोनेरी पान म्हणून आपण जपून ठेवावे असेच आहे. जोधा-अकबरच्या प्रेमाला इतिहासाने जसे स्वीकारले तसे बाजीराव-मस्तानीला इतिहास आणि आजचं समाजमनही स्वीकारत नाही.. हे त्या जीर्ण झालेल्या ऐतिहासिक स्थानाकडे बघून वाटतं...

मस्तानीच्या स्मृतीला एक रोमांचक इतिहास म्हणून महत्त्व मिळेल अशी अपेक्षा करायला तरी हरकत नाही. म्हणतात ना जो समाज आपला इतिहास सांभाळतो तोच सुसंस्कृत आणि समृद्ध समजला जातो.

### मस्तानीने गिळलेला हिरा आणि चोर



मस्तानीच्या समाधीस्थळावर गेल्यानंतर तुम्हाला समाधीतील काही चिरे पुन्हा नव्याने सांधलेले दिसतील.. मी त्याबाबत काही जणांना छेडले असता जी माहिती मिळाली ती (खरी की खोटी हे काळच जाणे ) खरंच फार चमत्कारी आहे. मस्तानीची समाधी आतापर्यंत एकूण तीन वेळा चोरांनी खोदण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील दोन वेळा समाधीपासून अंदाजे चार ते पाच फूट

अंतरावर खोल खड्डा करून समाधीच्या आतपर्यंत बोगदा पाडला होता. तर एक वेळा समाधीवरील दगड काढून खाली खोदण्याचा प्रयत्न केला होता. पण तत्कालीन बांधकामशास्त्र कमिशनवर चालत नसल्यामुळे अतिशय मजबूत होते. त्यामुळे दोन थरांच्या पुढे चोरांना जात आले नाही.. ते तसेच टाकून चोर पळून गेले.. हा खटाटोप कशासाठी केला असेल असे तुम्हाला वाटत असेल तर ऐका.. मस्तानीने मृत्यूपूर्वी एक मौल्यवान हिरा गिळला होता म्हणे..तो मिळावा म्हणून हा चोरांचा उपद्व्याप होता. हे कळले.. मला फार आश्चर्य वाटले; तुम्हालाही वाटले ना आश्चर्य !


एकेकाळी केवळ एकांतवास मिळावा म्हणून निवडलेलं स्थळ आज मात्र एकांताचीच भीती वाटावी असं झालं आहे. आम्ही मस्तानीची समाधी पाहण्यापूर्वी त्या गावातील इतर स्थळं पाहिली त्यात भव्य भरवनाथ मंदिर आणि जैन मंदिर पाहिले. दोन्ही मंदिरं गावाच्या वैभवात भर पाडणारे आहेत. मात्र ज्या मस्तानीच्या समाधीचे स्थान म्हणून मागच्या तीन शतकापासून जगभरातील इतिहासांच्या अभ्यासकांना खुणवणाऱ्या या गावात ही समाधी मात्र भग्न अवस्थेत पाहून काय दुर्दैवी होती ही सौंदर्याची सम्राज्ञी.. असंच वाटून जातं. हिदूंनी ‘ठेवलेली बाई’ म्हणून झटकले तर मुस्लीम समाजाला ती आपली वाटली नाही. मस्तानीच्या मृत्यूनंतर त्यावर जो चबुतरा बांधला आहे त्याची रचना समाधीसारखी आहे.. पण आज ती कबर म्हणून ओळखली जाते. दहा बाय पाच लांबी-रुंदी असलेल्या या समाधीवर एक फुलाची वेली आहे. ती वेली कधीही सुकत नाही असे जाणकार सांगतात. माझे प्रेम हे अमर होते आणि आहे अशीच कबुली या अमर वेलीच्या रूपात मस्तानी देत तर नसावी ना! असं त्या न सुकणाऱ्या वेलीकडे बघून क्षणभरासाठी वाटले. दिल्लीपर्यंत आपल्या मनगटाच्या बळावर साम्राज्याचा विस्तार करणाऱ्या या योद्ध्याच्या मनावर राज्य करणाऱ्या मस्तानीला समाजाने मात्र स्वीकारले नाही हे मात्र भूतकाळ, वर्तमानाने सिद्ध केलं आहे.

पश्चिम राष्ट्रांनी स्वत:च्या इतिहासाचे संवर्धन करून इतरांचाही इतिहास आपल्या संशोधनासाठी जवळ बाळगला. इतिहासाचे महत्त्व त्या लोकांना कळते. म्हणून त्यांनी शिवाजी महाराजांची तलवार, कोहिनूर आणि तुलनेने अलीकडच्या गांधीजींच्या वस्तू संग्रही ठेवल्या. त्या मिळवण्यासाठी आपण आज प्रयत्न करतो आहोत. या सर्व गोष्टींचा बोध घेऊन आपणही भविष्यात कदाचित हे शिकू.. त्यानंतर मस्तानीच्या स्मृतीला एक रोमांचक इतिहास म्हणून महत्त्व मिळेल अशी अपेक्षा करायला तरी हरकत

नाही. म्हणतात ना जो समाज आपला इतिहास सांभाळतो तोच सुसंस्कृत आणि समृद्ध समजला जातो. ते आपल्या बाबतीतही व्हावे ही आशा (कदाचित वेडी) बाळगून मस्तानीच्या समाधीला आणि तिच्या अपार प्रेमाला सलाम करून मी थांबतो. आपणही अवश्य जा आणि वेलीला हात लावून सांगा.. इतिहासाने तुला बदनाम केले. आम्ही मात्र निदान तुझ्या प्रेमाचा तरी गौरव करू..!!

lokprabha@expressindia.com

## चिंचोली मोराची :




हे गांव शिरूर तालुका जिल्हा पुणे येथे आहे.पुणे-नगर महामार्गावरून शिक्रापूर येथून३० कि.मी. अंतरावर मोराची चिंचोली हे गाव वसलेले आहे.या गावात व परिसरात असंख्य मोरांचे मुक्त वास्तव्य आहे.या गावात एका भल्या मोठ्या वेशीतुन गावात प्रवेश करतानाच एक ऐतिहासिक वाडा नजरेस पडतो. वडगाव मुखईच्या पलांडे सरदारांचा हा वाडा निराधर झाला. सध्या त्याच्या येथिल स्थानिक नागरिक मोरांना कोणत्याही प्रकारची इजा करत नाहीत.ते मोरांसाठी धान्याची व पाण्याची व्यवस्था करतात.तसेच येथे माऊली कृषी,ग्रामीण पर्यटन केंद्र आहे.

**टाकळी हाजी :** हे गांव शिरूर तालुक्यात असून पुणे जिल्ह्यात आहे.हे गांव पुणेनगर महामार्गावरून शिरूर पासून २५ कि.मी.अंतरावर आहे.येथे कुकडी नदीवर हजारो वर्षांपासून पाण्याच्या प्रवाहामुळे निसर्गतः रांजण खळगे तयार झालेले आहे. साधारण एप्रिल, मे च्या दरम्यान पाणी आटल्यावर लांबच लांब खाच दिसते. ही खाच म्हणजे एक निसर्गनिर्मीत चमत्कार आहे. या संपुर्ण खाचेत व भोवताली प्रचंड मोठ्या आकाराची विवरे तयार होतात. तसेच या खाचेच्या काठावर सफेद रंगाचे मळगंगा देवीचे मंदिरही लांबुन दिसते.







**वढू बुद्रुक:-** हे शिरूर तालुक्यातील भिमा नदीच्या काठी कोरेगांव भिमा पासून ३ कि.मी.अंतरावर आहे.येथे **धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज** आणि **कवी कुलेश** यांची समाधी आहे. महाराजांच्या प्रेरक जीवनकार्याविषयी...

संभाजी महाराजांचे प्रेरणादायी बलिदान

संभाजीराजांचा जन्म १४ मे १६५७ ला पुरंदर येथे झाला. इ. स. १५५६ मध्ये कनकगिरीच्या वेढ्यात मारले गेलेले आपले थोरले बंधू संभाजीराजे यांचेच नाव युवराजांना देण्याचे महाराजांनी ठरवले. शिवाजी महाराज स्वराज्य वाढविण्यासाठी अनेक ठिकाणी मोहिमा आखत असत. त्याचा लाभ लष्करी अनुभवाच्या दृष्टीने युवराजांना मिळत असे. युद्धकलेत आणि लष्करी डावपेचांत निपुण असलेल्या पित्याचे संभाजी महाराजांना मार्गदर्शन लाभत गेल्यामुळे ते युद्धकलेत तरबेज होऊ लागले. त्यांच्या युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ऍबेकॅरे नावाचा एक फ्रेंच प्रवासी वर्णन करतो... "शिवाजी महाराजांनी आपल्या मुलाला हाताखाली दहा हजार सैन्यांचा मोठा विभाग दिला होता. हा राजपुत्र वयाने जरी लहान असला तरी शौर्य आणि धैर्य यांच्या बाबतीत आपल्या वडिलांच्या कीर्तीला शोभेल असाच शूरवीर आहे.' सैनिकदेखील संभाजीराजे यांना शिवाजी महाराजांइतकाच मान देत असत. त्यांच्या हाताखाली लढण्यात सैनिकांना मोठी धन्यता वाटे.

संभाजीराजे नऊ वर्षांचे असताना शिवाजी महाराजांसोबत औरंगजेबला भेटण्यासाठी गेले होते. तेथे शिवाजी महाराज व त्यांच्या साथीदारांना नजरकैदेत ठेवले. आग्रा येथून शिवाजी महाराज निसटले. त्यांनी संभाजी महाराजांना मथुरा येथे काशीनाथपंतांकडे ठेवले. तेथे ते सुमारे आठ महिने होते. काशीनाथपंतांकडून त्यांनी संस्कृत भाषा शिकून घेतली. पुढे त्यांनी संस्कृतमध्ये काव्यरचनाही केली.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर त्यांनी संभाजी महाराजांवर एकेक जबाबदारी टाकण्यास सुरवात केली. त्यांची पन्हाळगडावर नियुक्ती करण्यात आली. तेथून बादशाही फौजांवर नजर ठेवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. तेथे त्यांनी बुधभूषण हे संस्कृत काव्य लिहिले. शिवाजी महाराजांचे निधन तीन एप्रिल १६८० रोजी झाले. संभाजी महाराजांच्या अनुपस्थिती त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

शिवाजी महाराज आजारी असल्याचे वृत्तही संभाजी महाराजांना देण्यात आले नव्हते, पण त्यांनी कोणत्याही वादात न पडता राज्यकारभार सुरू केला. बऱ्हाणपूरवर हल्ला करून त्यांनी औरंगजेबाच्या तावडीतून आपला प्रदेश सोडविला व स्वराज्यास जोडला. या विजयानंतर १६ जानेवारी १६८१ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला.

शिवरायांनी संभाजी महाराजांवर अनेक वेळेस वेगवेगळया जबाबदाऱ्या सोपवल्या. कधी दिवाणी काम, तर कधी मुत्सद्देगिरीची बोलणी; तर कधी युद्धाचीही. त्यांना दिलेली कामगिरी ते यशस्वीरीत्या पार पाडीत.

इ. स. १६८२ मध्ये औरंगजेबाने संभाजी महाराजांना विजापूरच्या आदिलशहाची मदत मिळू नये, म्हणून विजापूरच्या दिशेने शहाजादा आजमला मोठ्या सैन्यासह रवाना केले; तर अहमदनगरकडे रुहुल्लाखानाची रवानगी केली आणि नाशिक जिल्ह्यातील रामसेज किल्ला जिंकून घेण्यासाठी शहाबुद्दीन खानाचा सरदार पाठविला. रामसेज किल्ला ताब्यात घेण्याकरिता औरंगजेबने अनेक सरदार पाठविले, मात्र एकाही सरदारास तो किल्ला जिंकता आला नाही. मात्र या सर्व मोहिमेसाठी औरंगजेबाच्या तिजोरीतून खर्च होत होता व या सर्व प्रकारामुळे औरंगजेब संभाजीराजांवर चिडला. सगळीकडे कानावर आदळणाऱ्या अपयशाच्या बातम्यांनी त्याचा तोल ढळला व त्याने आपला किमॉंश (डोक्यावर घालायचे शिरोभूषण) दाणकन जमिनीवर आदळला आणि शपथ घेतली, "त्या संभाचा जीव घेतल्याशिवाय किंवा त्याला राज्यातून हाकलून दिल्याशिवाय मी किमॉंश परत डोक्यावर धारण करणार नाही.' औरंगजेबाची अशी अवस्था झाली ती संभाजीराजांच्या पराक्रमामुळेच.

१ फेब्रुवारी १६८९ या दिवशी शेख निजामाने संगमेश्वर येथे अचानक छापा टाकला. त्यात संभाजी राजे व कवी कलश हे दोघे जण कैद झाले. त्या वेळेस औरंगजेबाचा मुक्काम अकलूजला होता. त्याने तेथून हुकूम फर्माविला, की कैद्यांना पांडे पेडगाव येथील बहादूर गडाच्या छावणीत आणण्यात यावे. औरंगजेबाने राजांचे डोळे काढावयाची आणि कलशाची जीभ हासडायची आज्ञा दिली. कारवाई लगेच करण्यात आली. यानंतरही संभाजीमहाराज व कवी कलश यांना औरंगजेबाने खूप त्रास दिला. यानंतर औरंगजेबाने दाक्षी

सहुल्लाखान याला राजांकडे पाठवून खजिने व इतर धनसंपत्ती मोघलांकडे देण्यास सांगितले. तसेच फितूर मोघल सरदारांची नावे सांगण्यात यावी, असेही संभाजीराजांना सांगण्यात आले. कमालीच्या स्वाभिमानी संभाजीराजांनी कोणतीही माहिती सांगण्यास नकार दिला आणि बेधडकपणे ते मृत्यूला सामोरे गेले.

औरंगजेबाने ११ मार्च १६८९ रोजी त्यांची हत्या केली. त्यांचा मृतदेह वढू बुद्रुक परिसरात टाकला. औरंगजेबाच्या दहशतीमुळे त्यांच्या मृतदेहाला कोणीही हात लावला नाही. वढू परिसरातील काही शूर मावळयांनी त्यांच्या मृतदेहाचे दर्शन घेतले. मृतदेहाला हात लावला. तेव्हापासून वढू गावातील काही ग्रामस्थांचे नामकरण शिवले असे झाले. त्याचबरोबर काही ग्रामस्थांनी त्यांचा तेरवीचा कार्यक्रम (भंडारा) केला. तेव्हापासून त्यांचे अडनाव भंडारे झाले. औरंगजेबाच्या सैन्याने ज्या ठिकाणी संभाजी महाराजांना आडवले त्या गावाचे नाव आपटी असे पडले. काही ग्रामस्थांनी त्यांच्या मृतदेहाला फुले वाहून दर्शन घेतले. तेव्हापासून त्या गावाचे नाव फुलगाव पडले. भीमा, इंद्रायणी, भामा या नद्यांच्या संगमाजवळून संभाजी महाराजांना ओढीत आणले. तेव्हापासून त्यागावाचे नाव वढू पडले. त्याच ठिकाणी महाराजांच्या समाधीची निर्मिती करण्यात आली, अशी माहिती पुणे जिल्ह्यातील वढू, आपटी, फुलगाव येथील ग्रामस्थांच्या चर्चेतून मिळते.

संभाजी महाराजांच्या हत्येनंतर १८ वर्षे औरंगजेब स्वराज्य नेस्तनाबूत करण्यासाठी लढला, पण त्याला त्यात यश आले नाही. संभाजी महाराजांनी धर्मापुढे स्वतःच्या जीवाचीही पर्वा केली नाही. त्यांनी आपल्या कृतीतून धर्मप्रेमाचे उत्तम उदाहरण घालून दिले. संभाजी महाराजांच्या या अतुलनीय धैर्यामुळे आणि त्यांच्या बलिदानामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. महाराष्ट्रात प्रचंड अशी ताकद निर्माण झाली.

समाधीस्थळाचा इतिहास

फाल्गुन वद्य अमावस्येला (११ मार्च १६८९) वढूतील ग्रामस्थांनी या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांचे अंत्यसंस्कार केले. १७९९ पूर्वी राजांचे पुत्र छत्रपती शाहूराजे यांनी येथे पित्याचे वृंदावन बांधून नैवेद्य, धूप, बाग यासाठी व अन्नछत्रासाठी जमीन इनाम देऊन व्यवस्था केली.







**तळेगांव ढमढेरे :** तळेगांव ढमढेरे हे गांव शिरूर तालुक्यात असून पुण्यापासून ३० कि.मी.अंतरावर आहे.येथे गदर चळवळीचे प्रणेते हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे यांचे स्मारक आहे.

**हनुमान मंदिर कारेगाव**

हनुमान मंदिर ग्रामदैवत असून प्राचीन व जागृत देवस्थान आहे .



**वडगाव रासाई - मंदिरात ३०५ वर्षांपूर्वीची प्राचिन घंटा!**



येथील रासाई देवीच्या मंदिरामध्ये सुमारे ३०५ वर्षांपुर्वीची पोर्तूगीज कालीन घंटा देवीच्या गाभाराच्या सभामंडपाच्या दालनात पहायला मिळत आहे. या घंटेचा आवाज गेली तीन शतके गाव आणि परिसरामध्ये राहणाऱयांच्या कानी घुमत असून, इतकी वर्षे लोटली तरी ही घंटा आजही मजबूत अवस्थेत आहे.

गावच्या जुन्या इतिहासातील अत्यंत म्हत्वाची साक्ष म्हणून ही घंटा मोठया दिमाखात देवीच्या मंदिरात पाहणारांचे लक्ष वेधून घेते. या घंटेवर इसविसन १७०८ असे साल पहायला मिळत असून, घंटा पुर्णपणे ओतिव धातुची आहे. या घंटेचे वैशिष्ट्ये म्हणजे मंदिरामध्ये एकदा घंटा वाजविली तरी गावच्या कोपऱया-कोपऱयात आवाज जातो. आत्तापर्यंतच्या जुन्या घंटामध्ये हीचा समावेष होत असून, ही कोठे बनविली याचा इतिहास मात्र सांगता येत नाही. रासाई देवीचे मंदिर हे

अत्यंत जुने आहे. मंदिर पुर्वे-पश्चिम दिशेस असून हेमाडपंथी बांधकाम आहे. या बांधकामाचा नेमका कालावधी सांगता येत नाही.

मंदिराच्या आवारात एक शिलालेख असून, त्यावर शके १५५० असा मजकूर आहे. हे ठाणे रेणुकेचे जागृत देवस्थान समजले जाते. गावाला जुना ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय वारसा आहे. देश पारतंत्रयात असताना येथे इंग्रजांच्या विरोधामध्ये लढणारे एक स्वातंत्रविर आनंदस्वामी या गावात राहत होते. या सर्व घडामोडींमध्ये वरील घंटा या सर्व इतिहासाची साक्ष देत आजही सर्वांना वंदनीय आहे

आज पर्यंत मराठे, निजाम व मोघलांच्या युद्धा संबंधी हजारो कादंबऱ्या आल्या असतील अन गेल्या असतील पण एकही कादबंरीचा हिरो महार नव्हता. यामुळे एकंदरीत लोकाना असे वाटु लागले की महार म्हणजे फक्त गाव महारकी करुनच जगणारी जात होय. प्रत्येक लेखकानी इतिहास लिहताना प्रस्थापितांचे गुणगाण करणारे लिखाण केले. याच इतिहासकारांच्या लिखाणातील लढवय्या महारांचा संग्रहीत लिखाण म्हणजे हि कादंबरी. पण या सगळया लिखाणात मग ती कादंबरी असो व बखर असो यात महारांची थोरवी, त्यांचा लढवय्येपण हे नेहमी कुठल्यातरी कोपऱ्यात दडपुन टाकण्याचे काम करण्यात आले. पण संजय सोनवणी नावाच्या या महान लेखकाने हे सगळे दडपलेले, गाडलेले पुरावे एकत्र गोळा केले. विविध कादंबऱ्यात आपला महत्व हरपुन बसलेल्या या बहुजन नायकाना ज्यांचा वास्तवात छळ झाला अन शेकडो वर्षापासुन पुस्तकात किंवा लिखाणात सुद्धा बगल देऊन एक प्रकारे छळच झाला होता त्यांना नविन ओळख दिली. त्यांना श्री. संजय सोनवणी यांनी नविन ओळख दिली आहे.

### ...आणि पानिपत

पुणे जिल्ह्यातील **शिरुर** जवळ **वरुडे** नावाचं गाव आहे. तिथे महारवडयात भिमनाक नावाचा महार राहात होता. त्याला तिन मुलं त्यापैकी रायनाक अन येळनाक या दोन मुलांच्या वंशाची हि कहानी आहे. येळनाक हा राजगडावर नोकरीला असतो. दरम्यान तिथे मुघलानी हल्ला केला. मुघलाच्या सैन्याशी लढाई करताना रायनाकचे सगळेच साथीदार मारले जातात. पण हा पडला महार गडी याने हार मानलीच नाही. सगळे गारद झाले तरी याची तलवार तडफत होती. एकटाच सगळयाना पाणि पाजत होता. त्याचं हे शौर्य

बघुन मुघलांचा सरदार खुष होतो. येळनाकाला जिवंत पकडण्याचा आदेश देतो. येळनाकाला जिवंत धरुन सरदारच्या पुढे उभं केल्या जातो. सरदाराचं नाव असतं अशरफिखान. या अशरिफिखानाची बुद्धी फार तल्लख. येळनाकाचं शौर्य त्याच्या डोळयात भरतं अन येळनाकला ईस्लाम स्विकारण्यास व ५० स्वारचा म्होरक्या होण्याची ऑफर देतो. सुरवातीला येळनाक हा प्रस्ताव अमान्य करतो, पण अशरफीखान फार हुशार. त्यानी येळनाक महार असल्याचं ओळखलं होतं. महार म्हणुन त्याची त्याच्याच समाजबांधवातर्फे जो छळ चाललेला असतो या बद्दल अशरफीखान चांगलाच जाणकार  असतो.  याच मुद्याला धरुन येळनाकचा मेलेला आत्मसन्मान जागरुक केला जातो. जातीच्या नावाखाली पायाखाली तुळवुन घेण्यापेक्षा ईस्लाम स्विकारल्यास तुला माणुस म्हणुन स्विकारलं जाईल. तु आज ज्या हिंदु धर्मात आहेस तिथे तुझ्या जातीवरुन तुझं स्थान ठरतं. पण माझ्या धर्मात आलास तर तुझं स्थान तुझ्या कर्तुत्वावरुन ठरेल. तेंव्हा तुच विचार कर तुला कुठला धर्म योग्य वाटतो. हे मात्र पटण्यासारखं होतं. हिंदु बनुन सवर्णांच्या पायी तुळविल्या जाण्यापेक्षा आपल्या कला गुणाना जिथे वाव आहे त्या धर्मात जाणे कधिही बेहत्तर. अन शेवटी येळनाक ईस्लाम स्विकारतो व हसन अली हे नाव धारण करतो. आता हसन अली सरदार अशरफिखान सोबत कित्येक लढाया फत्ते करु लागला. प्रत्येक विजया नंतर त्याच्या शौर्याची कदर होऊ लागली. पाहता पाहता हसन अली हा एक महार म्हणुन लाथा खाणाऱ्या अस्पृश्या पासुन ५०० स्वारांचा म्होरक्या बनतो. ईस्लाममधे जातीभेद नसल्यामुळे त्याच्या दर्जाला शोभेल अशी बायकोही मिळते, बख्तियार नावाचा मुलगा होतो अन शाही थाटात जगु लागतो. दरम्यान काळात त्याने कित्येक लढाया फत्ते करुन अशरफीखानच्या सैन्यातील एक महत्वाचा व्यक्ती म्हणुन स्थान पटकावतो.

इकडे त्याचा भाऊ रायनाक संताजीच्या सैन्यात भरती होतो. नंतर धनाजी जाधवाच्या सैन्याकडुन लढु लागतो. पण धनाजी जाधवानी शाहुशी संधान बांधल्यावर व याच दरम्यान गावातील पाटलाचा बळी गेल्यामुळे नाराज होऊन परत केंव्हाच तिकडे न फिरकण्याचा निश्चय करतो. याला सिदनाक नावाचा मुलगा होतो. भिमनाकाचे दोन मुल एक मुसलमान बनतो अन शाही जिवन जगु लागतो. दुसरा महारकी करत वरुड्यात हिंदुच्या लाथा खात, फेकलेल्या तुकड्यांवर गुजारा करत असतो. तिकडे भिमनाकाचा नातु बख्तियार शानो शौकतिने वाढत असतो तर ईकडे दुसरा नातु सिदनाक मात्र फेकलेल्या तुकड्यावर कसं बसं

जगत असतो. एक स्वाभिमान, आत्मसन्मानाने वाढत असतो तर दुसरा गुलाम, हिंदुंची चाकरी करणारा अस्पृश्य म्हणुन वाढत असतो. दोघांच्या अंगात रक्त भिमनाकाचं पण धर्माचे संस्कार वेगळे. ईस्लाम मधे माणसाला माणुस म्हणुन वागणुक मिळत असते. परिणामत: त्याच्या कलागुणांचा विकास होतो. दुसराही त्याच घराण्यातील पण हिंदु संस्काराच्या अस्पृश्यतेचा बळी चढलेला हा सिदनाका गुलामीच्या वेढ्यात अडकून आयुष्याची होळी होताना भ्र शब्द न उच्चारता या नालायक व्यवस्थेशी ईमान राखत जगतो. पुढे या सिदनाकचं लग्न होतं. त्याला मुलगा होतो, रायनाकला आपला बाप भिमनाकच पोराच्या पोटी जन्माला आला असे वाटते अन त्याचं नाव रायनाक आपल्या बापाच्या नावावरुन भिमनाक असे ठेवतो.

## दिल्लीचा तख्त पलटविणारा महार

आज पासुन ३०० वर्षा पुर्वी औरंगजेबाच्या दिल्लीत जाऊन तख्त पलटविण्याचा इतिहासात महाराचा मोठा वाटा आहे.. औरंगजेबानंतर आलमगिरी आजमशहा दिल्लीच्या गादीवर बसतो. अशरफीखान हसन अली सकट दिल्लीच्या दिशेन कुच करतो. आजमशहाचा भाऊ मुअज्जमने भावाच्या विरोधात बंड केलं. अशरफीखान सोबत हसन अली मुअज्जमला जाऊन मिळतात. आजमशहाचा पराभव करुन मुअज्जम तख्तनशिन होतो. आपल्या नावाची द्वाही फिरवुन “बहाद्दरशहा” हे नाव धारण करतो. या सगळया तख्ता पालटामधे हसन अली महत्वाची भुमिका वटवित असतो. दिल्लीतील राजकारणात महत्वाची भुमिका वट्वुन अशरफिखान अन हसन अली दोघेही अशरफीखानच्या जहागिरीत “चिताहगड” ला रवाना होतात.

मधल्या काळात बहाद्दुरशहासाठी मोठ्या मोहीमा जिंकुन देण्याचे काम अशरफीखान अनहसन अली यानी चोखपणे पार पाडले. प्रत्येक मोहिम जिंकुन दिली. एक महार दिल्लीच्या राजकारणात केवढा प्रभावी व्यक्तिमत्व बनला होता. ईकडे पेशव्याना मात्र याची भणकही नव्हती. फरक एवढाच होता की त्या महारानी हिंदूंची चाकरी सोडुन ईस्लाम स्विकारला होता अन अंगी असलेल्या उपजत गुणांचा डंका दाही दिशा वाजु लागला. अंगभुत गुणांचा विकास होण्यासाठी पोषक वातावरन मिळताच एक महाराच्या क्षमतेच्या कक्षा ईतक्या विस्तारल्या की तो दिल्लीच्या तख्तमधिल प्रत्येक महत्वाचा कामात नुसता सहभागी होत नाही तर दिल्लीच्या गादीवर कोण बसणार याचा निर्णयही (अशरफीखानच्या सोबतीने)

तोच घेतो. दरम्यान बहाद्दुरशहाचा मृत्यु होतो अन त्याचा मुलगा जहांदरशहा दिल्लीच्या गादीवर बसण्यासाठी पाठिंबा मिळावा म्हणुन अशरफीखानची मदत मागतो. पण अशरफीखानला जहांदरशहाचा अय्याशी व उधळेपणाचा तिरस्कार असतो. म्हणुन अशरफीखान तटस्थ राहुन सगळं बघत असतो. तिकडे दोन महिन्याच्या डावपेचा नंतर जहांदरशहा आपल्या तिन्ही दावेदार भावांची हत्त्या करुन तख्तनशीन बनतो. आता अशरफीखानची जहागिरी जप्त करण्याचा खलिता पाठवितो. पण अशरफीखानच्या सोबतीला एक खंदा महार होता. अशरफीखाननी दिल्लीचा बादशहा जहांदरशहालाचा पायऊतार करण्याचं ठरवुन टाकतो अन हसन अलिच्या सोबतीनं इलाहाबादकडे कुच करतो. इलाहाबादला संय्यद बंधुशी संधान बांधुन दिल्लीच्या बादशहाचा तख्ता पालट करण्याचा आराखडा तयार केला जातो. बंगालचा सुभेदार फर्रुकसियर हा औरंगजेबाचा नातु. जहांदरशहाला बाद करुन फर्रुकसियरला गादीवर बसविण्याच ठरतं अन त्याला पाचारण करण्यात येतं. फर्रुकसियर येताच जहांदरशहाला बेतख्त होण्याचा हुकुम सोडण्यात येतो. त्यानी नकार दिल्यावर चढाई होते. चढाईमधे सगळयात महत्वाची आघाडी सांभाळणार लढवय्या हसन अलीच असतो. बादशहाला सळो की पळो करणारा हसन अली वजीराच्या आघाडीवर तुटुन पडतो. पराक्रमाची शर्थ करतो. जहांदरशहाच्या कित्येक आघाड्या उध्वस्त करतो. वजीर झुल्फिकारखान एक खंदा व धुर्त लढवय्या. पण हसन अलीच्या शौर्यापुढे त्याचाही टिकाव लागत नाही. वजीराला पळता भुई कमी करतो अन शेवटी जमिनीवर लोळवतो. नंतर वजीराचं डोकं कलम करुन फर्रुकसियर याना पेश करतो. या शौर्यावर खुष होऊन फर्रुकसियरने हसन अलीला सिपाहसालर या खिताबाने नवाजतो.

आता दिल्लीचा बादशहा फर्रुकसियर हा हसन अली व अशरफीखानच्या मर्जीतला असतो. अशा प्रकारे दिल्लीतील तख्ता पालट करणारा हसन अली हा **पुणे जिल्ह्यातील वरुडे गावचा एक महार** होय.

## पानिपतचा हिरो - बख्तियार (एक महार)

ईकडे मात्र हसनचा भाऊ रायनाक लोकांची चाकरी करुन जगतो असतो. हसनने रायनाकला ईस्लाम स्विकारुन स्वत:चा उद्दार करण्याचे अनेक संदेश पाठविले पण तो नकार देतो. एकदा गावचा भट आजारी पडतो म्हणुन रायनाकचा मुलगा सिदनाक पुण्याला भटाच्या मुलाना खबर देण्यासाठी जातो. पण पुण्यात

राज्य पेशव्यांचं. महाराची सावलीही पडु नये असा नियम. सिदनाकाला या नियमाची तेवढी जाण नसते. त्याची सावली एका भटावर पडत अन तिथल्या तिथे पेशव्यांच्या सिपायाने सिदनाकचा सर कलम केला. सिदनाक शनिवार वाड्याच्या जवळच मारल्या जातो. दोष काय तर बामणावर सावली पाडली. तिकडे याच सिदनाकचा चुलत भाऊ बख्तियार मात्र पेशव्यांचे राज्य मोडुन काढण्याची अफाट शक्ती अंगी बाळगुन असतो. तसा बाजीरावाशी लढण्याचा योग येतो पण बाजीराव चोर वाटेने येऊन पळुन जातो अन बख्तियारचं स्वप्न स्वप्नच राहतं. नाहितर पानिपतच्या आधिच पेशवा बाजीरावचा सर कलम केल्या गेला असता अन तेही एक महाराच्या हाताने पण बाजीराव थोडक्यात बचावतो.सिदनाकची हत्या झाल्यावर त्याचा मुलगा भिमनाक पोरका होता. तेंव्हा मात्र आजोबारायनाकला आपल्या भावाची म्हणजे हसन अलीची गोष्ट पट्ते. या पेशव्यांशी बदला घ्यायचा असल्यास काकाकडे जाऊन ईस्लाम स्विकार असा सल्ला देतो अन भिमनाक पेशव्यांशी बदला घेण्यासाठी काकाच्या आश्रयाला उत्तरेस निघतो. याच दरम्यान सदाशिवराव भाऊ पानिपतच्या लढाईसाठी पुण्याहुन रवाना होतो. भिमनाक त्याच जथ्यात सामिल होऊन उत्तरेस निघतो. बापाच्या खुनामुळे खवळलेला भिमनाक पेशव्याचा सिर कलम करण्याचा मनसुबा बाळगुन असतो. वाटेत एकदा तसा योगही येतो पण बख्तियार काकाच्या आगमनाने ती संधी जाते.

पानिपतची लढाई तोंडावर येते. या लढाईत पेशव्याना शिकस्त देण्यासाठी नजीमखानअन बख्तियार (पुर्वाश्रमीचा महार) एकत्र येतात. लढाईच्या काळात भिमनाकचा काका अब्दालीच्या सैन्यात असतो तर भिमनाक ईकडे भाऊच्या सैन्यात. एक रणांगणात लढण्यासाठी असतो तर दुसरा चाकरी करण्यासाठी. एक मर्दुमकी गाजवत असतो तर दुसरा लाचारीचे जीवन जगत असतो. हा फरक आहे त्या हिंदूच्या जातियवादाचा, हा परिणाम आहे गुणवत्तेला डावलण्याऱ्या ब्राह्मणी व्यवस्थेचा, अन पेशव्यांच्या काळात या जातीयवादाने कळस गाठला होता. हे दोघे बहाद्दुर अब्दालीला बरीच आमीश दाखवुन लढाईसाठी ईथे थांबवुन ठेवतात. अब्दाली मधेच उठुन परत जाण्याचा हट्ट धरे पण पेशव्याना पाणि पाजण्यासाठी त्याची नितांत गरज होते हे ओळखु असलेले हे दोन महारथी त्याला कुठल्याही किमतीत जाऊ देत नव्हते. शेवटी यांच्या मनासारखंच होतं, पेशव्यांशी आमना सामना होतो. बख्तियारने सगळी ताकत झोकुन दिली.



कुठल्याही किमतीत पेशव्यांचा नायनाट करायचा असतो. आपल्या अंगातील मर्दुमकी दाखविण्याची ही आगळी वेगळी संधी असते अन पेशव्याना तलवारीने पाणि पाजण्यात येते. पेशव्यांच्या चिंध्या चिंध्या करणारा अब्दालीचा उजवा हात नजीमखान असतो तर डावा हात बख्तियार असतो. पेशव्यांचा नायनाट करणार शुर सरदार बख्तियार हा वरुड्याचा महार होय. पेशव्यांच्या सैन्याची दानादान उडते, बख्तियारचं सैन्य पेशव्याच्या सैन्याला उभं गवत कापावं तसं कापत सुटते, विश्वासराव धारातिर्थी पड्तो ईकडे भाऊही कोसळतो. हे सगळं पाहुन पेशव्यांचा सिर कलम करण्याची ईच्छा बाळगणाऱ्या भिमनाकाचं हृदय द्रवतं, कारण आम्ही दयावान माणसं. सगळे वैर विसरुन दया दाखविण्याची आमची जात. भिमनाकाला भाऊची दया येते, अन मैदानात मरणावस्थेत पडलेल्या भाऊला उचलुन नदिच्या पल्ल्याड नेऊन जीवनदान देणाराही त्याच वरुड्याचा महार भिमनाक असतो. अशा या शुर महारांच्या शौर्याची कथा उलगडण्याचं सोनवणी साहेबांचा हतखंडा फार निराळा. त्यानी एक एक घटना जिवंत उभ्या केल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीचित्रण अचुक टिपलय. आजच्या बौद्धाना अभिमान वाटावं असा हा इतिहास या कादंबरीने उलगडाला आहे. प्रत्येक बौद्धाच्या (पुर्वाश्रमीच्या महाराच्या) घरी संग्रही ठेवावी अशी ही महाराची वीर गाथा म्हणजे ........आणि पानिपत.

एकदा नक्की वाचा.

## पिंपरी धुमाळ

ह्या गावात एक सुंदर काळया दगडा मध्ये केलेले हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिरावर उत्कृष्ट कोरीव काम आहे. फियाट भारत ऑटोमोटिव्ह उत्पादन प्लान्टच्या बाजुला पिंपरी धुमाळ हे गाव आहे. प्रसिद्ध अशा रांजणगाव गणपतीपासुन हे गाव जवळ आहे.









## दौंड तालुका

बागायती  तालुका म्हणुन दौंडची ओळख आहे.ह्या तालुक्यातील महत्त्वपूर्ण झाडोरा हा काटेरी झुडुपी जंगल या प्रकारांतर्गत मोडते. भिमा नदीच्या  तीरावरील देवस्थाने, कुरकुंभची देवी, नारायण बेट येथील दत्त मंदिर, केडगावचे पंडिता रमाबाई मिशन, मलठनचा दादोजी कोंडदेव यांचा वाडा या बाबींमुळे पर्यटनदृष्ट्या दौंड तालुका महत्वाचा आहे.



पुणे सोलापुर महामार्गावर दौंड तालुक्यातील कुरकुंभ येथे फिरंगाई देवीची दोन ऐतिहासिक मंदिरे आहेत. फलटण संस्थानचे अधिपती संभाजीराव नाईक यांनी सन १७५९ मध्ये मंदिराचा जीर्णोध्दार केला. तो शिलालेख उपलब्ध आहे. ५१ शक्तिपीठांमध्ये फिरंगाई देवीचे स्थान आहे. कुरकुंभ गावात आणि जवळच्या टेकडीवर अशी दोन मंदिरे आहेत. टेकडीवरील मंदिरात देवीची अवघी सहा इंच उंचीची मुर्ती, महादेवाची पिंड, गुराख्याची घोंगडी आहे.



दौंड शहरा पासून दौंड - कुरकुंभ रोडवर ५ कि .मी अंतरावर निसर्गरम्य गुप्तेश्वर फारेस्ट तळे



## वाघोली

येथे शिव शंकराचे मंदिर आहे.वाघेश्वर ह्यावरुनच गावाला वाघोली हे नाव पडले आहे. वढू तुळापुरच्या  थोडे पुढेच हे मंदिर आहे. मंदिराच्या बाजुला तलाव आणि गार्डन पसरलेले आहे. मंदिर काळया दगडात कोरलेले आहे. मंदिराच्या पुढेच थोड्या अंतरावर पिलाजीराव जाधव हे पेशवाईचे सरदार होते त्यांची समाधी आहे.

‘ ‘







## विश्वव्यापी मानवधर्म आश्रम, पाटेठाण, तालुका दौंड

ही एक आध्यात्मिक व सामाजिक कार्य करणारी संस्था असून प.पु. सद्गुरु समर्थ श्री,गणपत नानाजी हंबीर (हंबीर बाबा ) यांनी स्थापन केली आहे, व सध्या बाबांचे सतशिष्य व सुपुत्र प.पु. सद्गुरु श्री, सुमंतबापू हंबीर, हे या संस्थेचे विध्यामान अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रातील अनेक गावोगावी फिरून अध्यात्मिक प्रवचने व वृक्षारोपण स्त्री भ्रूण हत्या तसेच खरा देव, व खरा धर्म, खरी भक्ती व खोटी भक्ती तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करत असतात. त्यांचे हे कार्य अगदी अव्याहत पणे अख्या महाराष्ट्रभर अखंड पणाने चालू आहे,

अवांतर माहिती मागे (ता. दौंड) सोनवडी येथील भीमा नदीच्या पात्रात १०० वर्षे वयाचे व २००किलो वजनाचे कासव मृतावस्थेत सापडले आहे. या कासवाची उंची ६ फूट ३ इंच असून मान २ फूट ८ इंच आहे. शेवाळी रंग, नॅरो हेटेड सॉफ्ट सेल टर्टल (चित्रा इंडिका) जातीचे हे कासव होते. सोनवडी येथे १९८१ ला भीमा किनार्यावर साधारणत: १२५ किलो वजनाचे कासव सापडले होते. त्यानंतर आता पुन्हा २०० किलो वजनाचे कासव सापडल्यामुळे हा एक योगायोग समजला जातो.

शितोळे कृषी पर्यटन केंद्रसंपर्क - श्री. बाळासाहेब जयवंतराव शितोळे

सी-8,समर्थ पार्क,आनंदनगर,पुणे-५१

मु.पो. कुसेगांव,(वाघदरा), ता. दौंड,जि. पुणे.

## इंदापूर तालुका

इंदापूर तालुका हा पुणे जिल्ह्याच्या सरहद्दीवर असून पुणे जिह्याच्या पूर्वेस शेवटचा तालुका आहे. इंदापूर तालुका भीमा व नीरा नदीच्या परिसरात आहे. पौराणिक काळात इंदापूरचे नांव इंद्रपुरी असे होते. तालुक्याचा भाग पूर्वी मालोजीराजे भोसले यांचे जहागिरीमध्ये समाविष्ट होता. इंदापूर हे तालुक्याचे मुख्यालय असून त्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये आहेत. इंदापूर तालुक्यामधून पुणे-हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ जात असून इंदापूर-पुणे हे अंतर १३५ कि. मी. आहे.

तालुक्याचे उत्तर सीमेवर भीमा नदी वाहत असून दक्षिणेस नीरा नदी आहे. भीमा नदीवर सुप्रसिद्ध उजनी धरण असून जलाशयात २२ गावे बुडाली आहेत.. धरणाच्या पाण्याचा फुगवटा सुमारे ५० कि. मी. असून त्या पाण्याचा उपयोग कृषिविकास व मत्स्यपालनासाठी होत आहे. तालुक्यातील भीमा व नीरा दोन नद्या, धरणाच्या पाण्याचा फुगवटा व नीरा कालवा यामुळे बहुतांशी भाग बागायती असून तालुक्याचा मध्यभागच्या पठारावरील भाग हा जिरायती आहे. प्रमुख व्यवसाय शेती असून ऊस हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. इंदापूर तालुक्यात सहकारी तत्त्वावर तीन साखर कारखाने आहेत. सर्वात जुना श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, भवानीनगर असून त्यानंतर इंदापूर सहकारी आत्ताचा कर्मयोगी शंकरराव‌जी पाटील सहकारी साखर कारखाना, महात्मा फुले नगर बिजवडी व त्यानंतर नीरा-भीमा सहकारी साखर कारखाना, शहाजीनगर हा आहे. तसेच एक खाजगी साखर कारखाना एक व खाजगी गुळाचा कारखाना आहे.

इंदापूरला ऐतिहासिक महत्व आहे. तालुक्याचा भाग पूर्वी शिवाजीराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे जहागिरीमध्ये समाविष्ट होता. मुघल साम्राज्य विस्तार करत असताना मालोजीराजे येथील युद्धात मरण पावले.

## श्री क्षेत्र निरा-नरसिंहपूर - स्थान आणि महात्म्य

निरानरसिंहपूर हे स्थान आग्नेय दिशेस असून पुणे जिल्याचे ते शेवटचे टोक आहे.क्षेत्राच्या एका बाजूने निरा नदी तर दुसऱ्या बाजूने भीमा नदी आणि तिसऱ्या बाजूस या उभयतांचा संगम. तीन बाजूने पाणी व एका बाजूस जमीन असे हे रमणीय स्थान आहे. या क्षेत्राचा आकार सिंहाच्या नाखासारखा आहे.

येथील श्री नरसिंह हा महाराष्ट्र ,कर्नाटक आणि मध्य-प्रदेश यातील अनेक नरसिंह भक्तांचा कुलस्वामी आहे.या सर्व भक्तांचे श्री नरसिंह हे अधिष्ठान आहे.ते या क्षेत्रास मानतात.इतकेच काय तर ज्यांचा कुलस्वामी नाही अशा हि अनेकांना क्षेत्राचे महात्म्य व रमणीयता जाणवली व ती त्यांनी मान्य केली.अनेक भक्त येथे दर्शनासाठी येतात व नरसिंहाचा आशीर्वाद घेतात.

तसेच या क्षेत्राला शास्त्रीय महत्व देखील आहे.असे म्हणजे शास्त्रज्ञानी या क्षेत्राचा अभ्यास केला होता. त्यात असे दिसून आले कि निरा- नरसिंहपूर हे पृथ्वीचे मध्यस्थान/ नाभिस्थान आहे. तसे शास्त्रीय पुरावे देखील आहेत.हे एक भू वैज्ञानिक सत्य आहे.जे अनेक लोकांना निरा-नरसिंहपुरला भेट देण्यास आकर्षित करतात.

तसे खूप पुरावे आहेत कि या पवित्र स्थानाला खूप मोठा इतिहास आहे.पूर्वी पासूनच हे स्थान प्रसिद्ध आणि धार्मिक आहे.आपल्याकडे असा पुरावा आहे कि पूर्वी प्रभू रामचंद्र यांनी आपली पवित्र यात्रा रावणाचा वाढ केल्यानंतर मुनी अगस्ती यांच्या सांगण्यावरून पूर्ण केली. त्यांनी हि यात्रा निरा-नरसिंहपूर येथूनच सुरु केली होती.हे स्थान खूप सुंदर आणि धार्मिक आहे. अनेक मुनी आणि भक्त येथे पूजेसाठी येतात. असे म्हटले जाते कि महर्षी व्यास सुद्धा येथे काही कालावधीसाठी राहिले होते.समर्थ रामदास यांनी दोन वेळा निरानरसिंहपूर येथे भेट दिली याची प्रचीती येते.शके १५५३ च्या एकादशीस समर्थ पंढरपुरास आले होते.चंपाषष्ठी साठी त्यांना पालीच्या खंडोबाला जायचे होते.ते येथे आले होते आणि त्यांनी संगमावर स्नान ,संध्या आटपून त्यांनी एक सुंदर कीर्तन सादर केले होते.निरा आणि भीमा नदीच्या संगमावर असलेला अंडाकृती प्रचंड असा घाट शके १५२७ मध्ये बांधून पूर्ण झाला.हे बांधकाम कोणी त्रिमलापाळ दाधजी

मुधोजी यांनी केले.सदरील बांधकाम सतत ३ वर्षे चालू होते. पुढे शके १७८७ साली रघुनाथ राव विन्चुरकर यांनी देवालयाचा एकदरीत जीर्णोद्धार केला त्यासंबंदीचा शिलालेख देवालयात उपलब्ध आहे.

**देवालयाच्या आतील बाजूस असणाऱ्या परिवार देवता खालील प्रमाणे**

१) शेजघर : हे रंगशिळेच्या गाभाऱ्यात असून शेजघरात दोन पलंग आहेत.एक श्री नरसिंहाचा व दुसरा शामराजाचा .पलंगावर गाद्या ,गिर्द्या ,उश्या व श्रींची प्रतिमा आहे.

२) स्तंभ-नरसिंह : रंग शिळेच्या सभा मंडपातील एका स्तंभावर हिरण्यकश्यपूच्या वधाचा प्रसंग कोरलेला आहे.

३) लक्ष्मी मंदिर : श्री नरसिंहाचे डावे बाजूस श्री महालक्ष्मीचे मंदिर आहे. श्री महालक्ष्मीची रेखीव व सुंदर मूर्ती गंडकी शिळेची आहे.मूर्ती उभी आहे.पूजा बांधल्यावर बसल्यासारखी दिसते.या मंदिराचे शिखर हे दगडी आहे.हे शिखर निरा नदीच्या पात्रापासून सुमारे १५० फुट उंच आहे.शिखराच्या दोन दगडामध्ये एक लहानशी पहात आहे.त्यातून दिवस रात्र पाणी जीरपते.उगमस्थान अज्ञात असलेला हा लहानसा पाझर येथे गुप्त गंगा म्हणून ओळखला जातो.हा एक चमत्कारच आहे.तर्क शास्त्राने याचा उलगडा करता येत नाही.

४) भक्त प्रल्हाद मंदिर : श्री नरसिंहाच्या समोर लाकडी सभामंडपात भक्त प्रल्हादाचे मंदिर आहे. हात जोडून उभी राहिलेली ही मूर्ती काळ्या पाषाणाची आहे.प्रल्हाद कृत नरसिंह मूर्ती व प्रल्हाद मूर्ती एकमेकांच्या समोर असून नरसिंह मूर्तीच्या पायांच्या समपातलीस या मूर्तीचे मस्तक येते हे एक विशेष आहे.

५) श्री दत्तात्रय मंदिर : दत्तासाठी एक छोटेसे देवालय बांधलेले आहे.हे बांधकाम संपूर्ण लाकडी असून दत्तमूर्ती पांढऱ्या संगमरवरी दगडाची आहे.हि मनोहर मूर्ती सिंहासनावर स्थापित आहे.

६) भीमा शंकर : देवाच्या उजव्या बाजूस भीमा शंकराचे छोटेसे देऊळ आहे. शाळूकिंच्या मानाने पिंडी उंच आहे.

७) विठ्ठल-रुक्मिणी : भीमा शंकराच्या उजव्या बाजूस छोट्या देवळात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती आहेत.दोन्ही मूर्ती पाहिल्यास पंढरपूरची आठवण येते.

८) राघवेंद्र स्वामी वृंदावन : मद्व संप्रदायाचे श्रद्धास्थान मंत्रालय स्थित श्री राघवेंद्र स्वामी हे भक्त प्रल्हादाचा अवतार होत.वृंदावन प्रवेशानंतर त्यांचा प्रत्यक्ष वास मंत्रालय क्षेत्री आहे.मंत्रालय सवे निरा नरसिंहपूर क्षेत्री मी विशिष्ट काळी निवास करेल अशी त्यांची भविष्यवाणी असल्याने शके १८५० साली श्री राघवेंद्र स्वामींचे वृंदावन श्री नरसिंह देवालयात बांधले गेले.दरवर्षी श्रावण महिन्यात आराधना महोत्सव साजरा केला जातो.

९) शालीग्राम : शाकंबरीच्या मंदिराजवळ शालीग्रामाच्या आकाराचा एक मोठा पाषाण आहे.

१०) तरटी नरसिंह : मोठा ओटा त्याच्या केंद्र स्थानी तरटी वृक्ष त्याच्या खाली श्रींच्या चार पादुका असून मंदिरा शेजारच्या दुसऱ्या तरटी वृक्षास पार बांधलेला आहे.

११) शाकंबरी : अठरा भूजांनी युक्त अशी देवीची मूर्ती या मंदिरात आहे.

१२) काशी विश्वेश्वर : खोल गाभारा असलेले शिकार युक्त व महादेवाच्या पिंडी प्रमाणे दिसणारे एक ओबडधोबड मध्यम देऊळ ,समोर बसविलेला एक मोठा दगडी नंदी व गाभाऱ्यातील पिंडी शाळुंका हा काशी विश्वेश्वर येथे आहे.पिंड काढली असता खोलगट भाग दिसतो त्यात तीन लिंग आहेत ते ब्रह्मा ,विष्णू आणि महेश



१३) काळा दत्त : काशी विश्वेश्वराच्या उजव्या बाजूस एका देवळात पाषाणाची दत्ताची मूर्ती आहे.त्यास काळा दत्त असे म्हणतात.

१४) मुहूर्त गणपती : एका स्तंभावरील कमानीत गजाननाची मूर्ती

आहे.मुख्य देवालय बांधण्याअगोदर ही मूर्ती स्थापन केली.



१५) काळभैरव : पूर्व दरवाज्याकडे भैरव नाथाचे देऊळ ओवरीत आहे.हे स्थान सोनारी येथील भैरव नाथाच्या दोन मूर्ती आहेत.

१६) रामेश्वर : लक्ष्मी मंदिर लगत एक रामेश्वराचे हे देऊळ आहे.

## १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर

श्री इ.स. १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर इंदापूर पुणे मध्ये आहे. या मंदिराचा नमुना नविन दक्षिण मंदिरासारखा आहे. या मंदिराचे मुख्य आकर्षण मुनिसुव्रत स्वामींचे सर्व पुतळे २७ फूट उंच व ग्रॅनाइटचे आहेत . मंदिराला सोनेरी रंग आहे. त्यामुळे त्याला सुवर्ण मंदिर असे देखिल म्हणतात. पुणे-४१३१२०






# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर आता . .हजार मराठी ई पुस्तके आहेत

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे.

No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य